। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ९६ वा । शुक्रवार, दिनांक १९ जून २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# यूएई आणि भारतामधील बँकिंग भागीदारी भारतीय अर्थव्यवस्थेच्या उत्कर्षाचे प्रतीक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांचा दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग

**मुंबई/प्रतिनिधी :** जगभरातील गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेतील विश्वास वाढत आहे. त्यामुळेच अरबी समुद्राच्या दोन्ही टोकांवरील मजबूत अर्थव्यवस्था असलेल्या यूएई आणि भारत देशातील बँकांमध्ये बँकिंग भागीदारी होत आहे. ही बँकिंग भागीदारी भारतीय अर्थव्यवस्थेच्या उत्कर्षाचे प्रतीक असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

कुलाबा येथील हॉटेल ताज पॅलेस येथे यूएई देशातील एमिरेट्स एनबीडी (नॅशनल बँक ऑफ दुबई) आणि मुंबई स्थित असलेली आरबीएल (रत्नाकर बँक लिमिटेड) यांच्यामध्ये बँकिंग भागीदारीचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय वित्त मंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग घेतला. आरबीएल बँकेचे संचालक चंदन सिन्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी आर सुब्रमण्यमकुमार, केंद्रीय वित्त विभागाचे सचिव संजय लोहिया, एमिरेट्स एनबीडीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक हिशाम अब्दुल्ला अल कासिम, बँक समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेने नेल्सन आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशाचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये भारताची जगामध्ये सर्वात जास्त वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. या अर्थव्यवस्थेच्या वेगामध्ये महाराष्ट्राचाही सिंहाचा वाटा आहे. देशातील ४० टक्के परकीय गुंतवणूक ही महाराष्ट्रामध्ये येत आहे. महाराष्ट्रामध्ये गुंतवणुकीच्या अपार संधी आहेत. समृद्धी महामार्ग, मुंबईतील पायाभूत सुविधा विकास प्रकल्प, मजबूत दळणवळण सुविधा यामुळे राज्य हे देशाच्या 'विकास गाथे'मध्ये अग्रणी आहे.



महाराष्ट्रात सुरू झालेल्या आरबीएल बँकेने आपल्या कार्याचा विस्तार जागतिक स्तरावर केला आहे. बँकेची ही प्रगती देशाच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे द्योतक आहे. त्यामुळेच आजची ही ऐतिहासिक भागीदारी भारताच्या विदेशी गुंतवणुकीचे सर्वात मोठे उदाहरण बनत आहे. हा कार्यक्रम केवळ कागदपत्रे हस्तांतरणाचा नाही, तर इतिहास निर्मितीचा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात यूएई आणि भारताचे संबंध अधिकाधिक दृढ होत आहे. ही आजची बँकिंग भागीदारी त्याचेच प्रतीक आहे. देश विदेशातील अनेक नामांकित बँक आज भारतीय बँकिंगसोबत भागीदारी करण्यास तयार आहे. यामुळे निश्चितच भारताची अर्थव्यवस्था अधिक विकसित होण्यासाठी मदत होणार आहे, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

आरबीएल बँक ही राज्यातील मोठा सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा भागीदार आहे. या निधीमधून ग्रामीण महाराष्ट्रसह सामाजिक जीवनाच्या परिवर्तनाचे कार्य होत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. एमिरेट्स एनबीडीचे उपाध्यक्ष हिशाम अब्दुल्ला अल कासिम म्हणाले की, या भागीदारीमुळे आणि भारतामधील व्यापार अधिक वृद्धिंगत होईल. भारतीय उद्योजक यूएईमध्ये येऊन गुंतवणूक करतील. या भागीदारीचा सकारात्मक प्रभाव दोन्ही देशातील बँकिंग व्यवस्थेवर पडणार आहे.

एमिरेट्स एनबीडी चे मुख्य कार्यकारी अधिकारी शेन नेल्सन बँकेच्या कार्याचा मागोवा घेताना म्हणाले की, भारत हा जगातील सर्वात जलद गतीने विकास करणारी अर्थव्यवस्था आहे. येथील बाजारपेठ विस्तारणारी असून ग्राहकांची संख्या मोठी आहे. भारतातील बँकेच्या भागीदारीतून एमिरेट्स एनबीडी भारतात आपल्या कार्याचा विस्तार करणार आहे. भारतातील आर्थिक सेवा क्षेत्रात एमिरेट्स या भागीदारीतून अधिकाधिक उत्तम काम उभारेल.भारताच्या ग्रोथ स्टोरी मध्ये यूएई आपला निश्चितच या भागीदारीच्या माध्यमातून सहभाग देईल.

प्रास्ताविक आरबीएल बँकेचे कार्यकारी संचालक जयदीप अय्यर यांनी केले. त्यांनी दोन्ही बँकांच्या भागीदारी बद्दल माहिती दिली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर सुब्रमण्यमकुमार यांनीही बँकेच्या कामगिरीचा आढाव घेत प्रकाश टाकला. एमिरेट्स एनबीडी बँकेकडून गुंतवणुकीचा धनादेश आरबीएल बँकेला सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमाला आरबीएल आणि एमिरेट्स एनबीडी बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

# श्री तुळजाभवानी मंदिरातील दर्शन व्यवस्थेत महत्वपूर्ण बदल

**धाराशिव/प्रतिनिधी:** श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या व दर्शन व्यवस्थेतील सुसूत्रता लक्षात घेऊन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने दर्शन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. नवीन दर्शन व्यवस्था गुरुवार,दि.१८ जूनपासून अंमलात येणार आहे.

नवीन दर्शन व्यवस्थेनुसार ५०० रुपये देणगी दर्शन पासधारक व रेफरल देणगी दर्शन पासधारक भाविकांना राजे शहाजी महाद्वार मार्गे मंदिरात प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर कल्लोळ तीर्थाच्या बाजूने टोळभैरव पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या तिसऱ्या मजल्यावर प्रवेश देऊन तेथून पहिल्या मजल्यात सोडण्यात येईल.

२०० रुपये देणगी दर्शन पासधारक भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या पहिल्या मजल्यात इमर्जन्सी गेट मार्गे प्रवेश देण्यात येईल.

धर्मदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्यावर प्रवेश देण्यात येईल. याप्रमाणे दर्शन मंडप पहिल्या मजल्यातील भुयारी मार्गात ५०० रुपये /२०० रुपये देणगी दर्शन व धर्मदर्शन रांग एकत्रित करून पुढे भाविकांना एकसमानतेने श्रीदेवीजींच्या दर्शनासाठी सोडण्यात येईल.

मुखदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची रांग बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या तळमजल्यावर सोडण्यात येणार आहे. तसेच सिंहासन पूजा व अभिषेक पूजेसाठी येणाऱ्या भाविकांची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच राहणार असून सिंहासन पूजेची रांग दत्त मंदिर गेटमधून तर अभिषेक पूजेची रांग छत्रपती संभाजी महाराज प्रांगणातून सोडण्यात येईल.

नवीन दर्शन व्यवस्थेमुळे ५०० रुपये देणगी दर्शन, रेफरल देणगी दर्शन, २०० रुपये देणगी दर्शन तसेच धर्मदर्शन रांगेतील सर्व भाविकांना आता एकाच ठिकाणाहून,म्हणजेच सिंहाच्या गाभाऱ्यातून श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेता येणार आहे.

# बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाईचा सकारात्मक परिणाम;

## १५ दिवसात एसटीच्या उत्पन्नात ४३ कोटी ८३ लाखांची वाढ..

**धाराशिव/प्रतिनिधी:** परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार आणि तत्कालीन औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत राज्यभरातील बसस्थानकांच्या २०० मीटर परिघातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती. प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे.

१ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न ४९५,कोटी ३४ लाख रुपये इतके झाले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४५१, कोटी ५१ लाख रुपयांच्या तुलनेत ४३ कोटी ८३ लाख रुपयांची (९.७१ टक्के) वाढ नोंदविण्यात आली आहे.म्हणजे दररोज चे सरासरी उत्पन्न ३ कोटी रुपयांनी वाढले आहे.

या कालावधीत रायगड (२ कोटी १७ लाख),पुणे (५ कोटी ९७ लाख), सातारा (३ कोटी ४६ लाख),छत्रपती संभाजीनगर (२ कोटी ६६ लाख), अमरावती (१ कोटी ६० लाख) नांदेड (२ कोटी २७ लाख) या विभागांनी सर्वाधिक उत्पन्नवाढ नोंदवली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की,बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता.न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. परिवहन विभाग,प्रादेशिक परिवहन कार्यालय,पोलीस आणि एसटी प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे.

श्री.सरनाईक यांनी पुढे सांगितले की,राज्यातील प्रत्येक बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील.प्रवाशांना सुरक्षित,विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

# क्राईम न्युज

## धाराशिवमधून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी नामे-ओमकार लक्ष्मण बांगर, वय १९ वर्षे, रा. भगवान बाबा नगर एमएच आय डी सी रोटरी हॉस्पीटल जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव यांची १५,००० किंमतीची मोटरसायकल फिर्यादीचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ओमकार बांगर यांनी दि.१७.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## बसमध्ये चढताना सोनसाखळीची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मुरलीधर तुकाराम बडवे, वय ७२ वर्षे, रा. श्रीकृष्ण नगर गोपाळपुर ता. पंढरपुर जि. सोलापुर हे दि. २२.०४.२०२६ रोजी १६.३० वा. सु. बसस्थानक उमरगा येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून मुरलीधर बडवे यांचे गळ्यातील सोन्याची चैन १२ ग्रॅम वजनाची एकुण ४६,४२० किंमतीची चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी मुरलीधर बडवे यांनी दि.१७.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## विनापरवाना तलवार बाळगली

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत हरिओम वय १९ रा. उमरगा चि. ता. तुळजापूर जि. धाराशिव, यांनी दि.१७.०६.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरात उमरगा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेली नळदुर्ग पोलीसांना मिळून आली. नमुद व्यक्तींनी मा. जिल्हाधिकारी धाराशिव यांचे शास्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केले. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-सुदर्शन व्यंकट घुले, पोलीस अमंलदार, नेमणुक पोलीस ठाणे नळदुर्ग यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# मृग नक्षत्र कोरडे; परंड्यात पेरणी रखडली:दमदार पावसाची प्रतीक्षा

**परंडा /प्रतिनिधी:** परंडा जून महिना निम्मा संपला तरी अद्याप पावसाने दमदार हजेरी लावलेली नाही. त्यामुळे परंडा परिसरातील शेतकरी हवालदिल झाले असून, चातकासारखी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागत पूर्ण झाली असून, केवळ काही भागांत अद्याप कामे सुरू आहेत. सुरुवातीला रोहिणी नक्षत्रात पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, त्यानंतरचे मृग नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

हवामान विभागाने या वर्षी 'अल निनो'चा प्रभाव राहणार असून पर्जन्यमान कमी असेल, असा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पेरणीबाबत शेतकरी आधीच साशंक आहेत. आतापर्यंत परंडा परिसरात केवळ ८० मिमी पावसाची नोंद झाली आहे. एवढ्या कमी पावसावर पेरणी करणे शक्य नाही, असे जाणकारांचे म्हणणे आहे. ज्या शेतकऱ्यांनी रोहिणी नक्षत्रातील सुरुवातीच्या पावसावर विसंबून पेरणी घाईघाईने उरकली, त्यांच्यावर आता दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसरीकडे, मजूर टंचाईमुळे शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर व इतर यंत्रांच्या साहाय्याने पेरणीपूर्व मशागत पूर्ण केली आहे. मात्र, डिझेलचे दर गगनाला भिडल्याने मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

**बियाणांचे दर कडाडले;** सोयाबीनकडे कल अधिक या वर्षी बाजारात बी-बियाणांचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. महागाई वाढूनही शेतकऱ्यांचा कल सोयाबीन, तूर, मूग, उडीद व अन्य डाळवर्गीय पिकांकडे दिसून येत आहे. यातही सोयाबीनचा पेरा सर्वाधिक होणार आहे; परंतु या वर्षी सोयाबीनचे बियाणे पोत्यामागे तब्बल १ हजार रुपयांनी महागल्याची माहिती व्यापाऱ्यांकडून मिळत आहे.

**बैलजोड्या नामशेष;** शेती पूर्णपणे यंत्रावर आधारित बदलत्या काळात ग्रामीण भागातून बैलजोड्यांचे प्रमाण कमालीचे घटले आहे. अनेक शेतकऱ्यांकडे बैलजोडी शिल्लक नसल्याने संपूर्ण शेती आता पूर्णपणे यंत्रांच्या साहाय्याने केली जात आहे. यामुळे शेतीचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

अवकाळीची नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्याचे पंचनामे पूर्ण झाले असून, प्रशासनाकडून अहवाल शासनाकडे पाठवण्यात आला आहे. आता पेरणीच्या कामाला वेग येण्यासाठी संपूर्ण तालुका केवळ दमदार पावसाची वाट पाहत आहे. पुढील काही दिवसांत मान्सून सक्रिय होईल, अशी आशा आहे.

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा




तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

अधिक माहितीसाठी भेट द्या: https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्ध थांबले! यातून काय शिकलो?

अमेरिका-इराण दरम्यान दिर्घ कालीन युद्ध आखेर माघे घेतल्याची घोषणा करण्यात आली. तसे दोघांदरम्यान करार करून त्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या, त्यामुळे जगात शांतता निर्माण होवून समस्यात सुधारणा होणार आहे. मुळात या युद्धामुळे जगात अस्थितरता निर्माण झाली होती. सर्व जगाभर महागाई वाढली होती. इंधन रोखल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. किंमती वाढल्या तरी इंधन मिळणे आवघड होत होते. पंतप्रधान मोदीजी यांनी योग्य नियोजन केल्याने अति त्रास झाला नाही. स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर कमी अधिक प्रमाणात मिळत होते. त्याचा ही गंभीर परिणाम झाला नाही. युद्ध थांबल्याचे व करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने समजताच एकप्रकारे डोक्यावरील वझे कमी झाल्याचे सारखे वाटत होते. कधी युद्ध संपेल व यामुळे निर्माण झालेल्या समस्यातून कधी सुटका होईल हे सांगणे कठिण झाले होते. दररोज नवीन अपडेट येत असल्याने युद्धविराम होतो का नाही असे वाटत होते. एक प्रकारे भीती निर्माण झाली होती. शेवटी युद्ध विरामवर करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. यात इस्त्राईलची प्रतिक्रिया कळून आली नाही. अमेरिकेने इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून जे इराण सोबत युद्ध केले ते योग्य नव्हते. तसे पाहिले तर यातून अमेरिकेने काय साध्य केले. उलट जग या बाबत चिंतेत होते. कोणालाही युद्ध नको आहे. यात पाकिस्ताने नाक खुपसण्याचा वायफल प्रयत्न केला. त्याला यात काय मिळाले. उलट पाकिस्तान अमेरिकेच्या बाजू घेवून चालत होता हे जगाने पाहिले आहे. तसे पाकिस्तान कसा आहे. जगाला माहिती आहे. भाडोत्री अतिरेकी पोसणारा देश आहे. ही बाब लपून नाही. त्याच प्रमाणे अमेरिका कसा आहे त्यापेक्षाही ट्रम्प यांची चाल उघडी पडली आहे. या युद्धा थांबण्यासाठी १४ कलमी करार झाले असले तरी दोघे ही याचे उल्लंघन करणार नाहीत कशावरून? असो सध्याला निर्माण होणारे संकट टळले आहे. वास्तविक भारतीयांनी या युद्धजन्य परिस्थितीत काय शिकायला मिळाले. हे जाणून घेतले पाहिजे. यापुर्वी नोटाबंदीत बरेच शिकलो. त्यानंतर लॉकडावुन झाले या काळात कसे काटसरीने वागायला, जगायला शिकलो. जीवनात यशस्वी काटसरीने वागण्याची शिकवण लॉकडावुन काळात मिळाली. तसे या युद्धाच्या काळात वायपट खर्च करायाचा नाही. विनाकारण इंधनाचा वापर करायाचा नाही. काम असेल तरच दोन-चार चाकी गाड्याचा वापर करायाचा. स्वयंपाकाचा गॅस आवश्यकतेनुसार वापर करायाचा असे किती तरी जीवनात यशस्वी होण्यासाठी शिकण्यात आले. आता यापुढे असे संकट आले तर जीवन कसे जगायाचे याची प्राथमिक ज्ञान याकाळात मिळाले आहे. त्यामुळे या एक लक्षात ठेवावे आपण आपले स्वयंपुर्ण बनले पाहिजे. कोणत्याही संकटावर मात करण्याचे ज्ञान मिळाले पाहिजे. काही झाले तरी संकटाला घाबरयाचे नाही तर हिंमतेने त्याचा तोंड देण्याची शिकवण यातून मिळाली आहे. संकट आल्यावर लढले पाहिजे हे यावरून सिद्ध होते. या युद्धात कौतुकास्पद कामगिरी ही इराणची आहे. मोठ्या हिंमतीने त्याने अमेरिकेशी दोन हात केले आहेत. आज इराणमधील स्थिती भयाण आहे. अनेक इमारती पडल्या आहेत. शाळा व रुग्णालयाचे मोठे नुकसान झाले आहे. यातून उभारी घेण्यासाठी बराच काळ लागणार आहे त्यासाठी अमेरिकेकडून मोठी मदतीची तरतुद या करारात करण्यात आली आहे. या करारात प्रामुख्याने युद्ध संपवणे, होर्मुझला खुले करणे आणि इराणला अणुबॉम्बपासून रोखणे हे त्यांचे लक्ष्य होते, जे पूर्ण झाले आहेत. जर इराणने अमेरिकेसोबत झालेल्या कराराचे उलंघन केले, तर त्यांच्यावर पुन्हा बॉम्ब हल्ला केला जाईल. त्यांनी सांगितले की, ते इराणला अणुबॉम्ब मिळवू देणार नाहीत. या बाबत चीनच्यामते दोन्ही पक्षांनी कराराचे पूर्णपणे पालन करावे असे विचार व्यक्त केले आहेत. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी म्हणाले की, सर्व पक्षांनी युद्धविरामाचा आदर केला पाहिजे. चीनने इराण आणि लेबनानला मानवतावादी मदत देण्याचीही घोषणा केली आहे. अमेरिका-इराण कराराच्या मसुद्यात युद्ध संपवणे, होर्मुझ उघडणे, तेल निर्यात, निर्बंधांमध्ये सवलत आणि गोठवलेले निधी जारी करणे यासह १४ मुद्द्यांवर सहमती झाली आहे. आता निधी बाबत अमेरिका शब्द पाळेलच असे नाही. आता पर्यंत ट्रम्प यांची भुमिका स्पष्ट दिसून येत नाही. कधी काय बोलतील किंवा चालतील हे सांगता येत नाही. मुळात युद्ध समाप्तीबाबत करारावर सह्या झाल्या असल्यातरी तातडीने अमल होणे अपेक्षित आहे. इराणकडे इंधनाचा साठा आहे. जगाला तो याबाबत नमवु शकतो. इंधनावर डोळा ठेवूनच अमेरिकेने केलेली कारवाई आहे हे लक्षात येते. या युद्धाचा परिणाम जगावर झाला आहे. त्यामुळे जगाने आता या बाबत चिंतनाची गरज आहे. भारताने या युद्धाचा परिणाम पाहून इंधनाबाबत स्वयंपुर्णता बाळगणे काळाची गरज आहे. भारताने अधिकाधिक सौरउर्जेचा वापर करावा. इलेक्ट्रिक गाड्याचा वापर वाढवावा. स्वयंपाकासाठी सौरउर्जावर चालणारी शेकडी बसवुन घ्यावी. केंद्राने या बाबत पुढाकार घ्यावा. जसे घरोघरी आता सोलारपॅनल बसविण्यात आले आहे तसे घरोघरी स्वयंपाक करण्यात येणारी यंत्रणा उभा करावी. त्याशिवाय यापुढे खैर नाही. या युद्धाने बरेच काही शिकविले आहे. तसे पाहिले तर आतापर्यंत 'धिरे से बडे झटके' असे म्हटले तरी चुकीचे ठरणारे नाही. युद्ध समाप्तीवर करार झाला तरी पुन्हा अचानक काही उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वेळीच सावध होणे काळाचीच गरज आहे. भारत देश लहान नाही. अशा मोठ्या देशात एखादी समस्या निर्माण झाली तर सरकारची डोकेदुखी होवू शकते. वास्तविक करारावर सह्या झाल्या असल्यातरी याची अमलबजावणी कधी. होर्मुज बंदर पुर्णतः खुले होणार का? जो पर्यंत समुद्रमार्गे मोठ्या प्रमाणात होर्मुजमधून इंधन भारतात येणार नाही तो पर्यंत समस्या कायम राहातील. केवळ करार झाला व युद्धसमाप्त झाले एवढेच जे काही ते सत्य आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प एवजी दुसरे असते तर काही तरी छातीठोक सांगता आले असते. ट्रम्प हे कधी शब्द बदलतील हे सांगता येत नाही. त्यामुळे युद्ध समाप्त झाले. करार झाला ही सर्वात मोठी आंनदाची व समाधानाची बाब आहे. याचे उल्लंघन कोणाकडूनही होवू नये ही अपेक्षा आहे. भारतच काय जगात या युद्धाचे परिणाम भोगावे लागले आहे. इंधन हे महत्वाचे आहे. जसे नरड्यावर नख लावले तसे इंधनावर निर्बंध आणले गेले होते. महागाई वाढली ती आता सरकारने कमी करण्याकडे पावले उचलली पाहिजेत. हीच अपेक्षा आहे.




# सुपर अल-निनो म्हणजे समस्याही सुपर !

आपल्या देशात १९७२ साली सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. त्याकाळी हवामानाचा वेध घेण्यासाठी उपग्रह यंत्रणा तसेच वातावरणात होणारे बदल याची माहिती जवळपास नव्हती. दुष्काळ आला इतकच ज्ञान सर्वांना होतं . आता बदलत्या तंत्रामुळे एल निनो अन् सूपर अल निनो याची माहिती खूप आधी आपणास झाली आहे. १९७२ सालचा दुष्काळ सर्वांना यासाठी स्मरणात आहे की, त्याकाळी मोठ्या प्रमाणावर अन्नटंचाई निर्माण झाली होती.

शेतीचे उत्पादन नगण्य झाल्याने खाण्यासाठी धान्य नाही अशी स्थिती असल्याने अमेरिकेतून आपणास धान्य मागवावे लागले होते. नंतरच्या काळात तांत्रिक आणि यांत्रिक प्रगती झपाट्याने झाली असली तरी समस्या कमी झालेली नाही. उलट समस्येचे स्वरूप खूप बदलले आहे आणि गंभीर झाले आहे. याची आपणास जाणीव असणे गरजेचे आहे.

१९७१ साली भूजल उपशाचे प्रमाण नगण्य होते आणि लोकसंख्या देखील मर्यादित होती. मात्र गेल्या ५ दशकात शहरीकरण झपाट्याने झाले आणि लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यावेळी पिकांचे संकट अधिक पेयजलाचे संकट असे दुहेरी संकट आपणासमोर आहे.

यांत्रिकीकरणात झालेली वाढ आणि ऊस, कापूस या सारख्या नगदी व नफा देणाऱ्या पिकांकडे शेतकरी वर्ग वळला, यामुळे भूजल ऊपसा प्रचंड प्रमाणात सुरू आहे. धरणे जरी बांधली गेली असली तरी त्या धरणाच्या पाण्याचा वापर उद्योग , कृषी आणि पेयजल असा विभागला आहे. नागरिकांच्या पेयजलाची काळजी घेण्यासाठी ठराविक क्षमतेनंतर कृषीला अर्थात सिंचनाला पाणी दिले जात नाही. सध्या दोन नक्षत्रे कोरडी गेली असल्यानं हे संकट अधिक गहिरं झालं आहे.

शेतकऱ्यांना निसर्ग जणू नाराज आहे आणि दुसऱ्या बाजूला आता सिंचनासाठी पाणी न देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अक्षरशः आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

अल-निनो समजून घेताना त्याच्या तांत्रिक बाबीत सांगता येईल की, प्रशांत महासागरात पाण्याचे तापमान सुमारे २ अंश सेल्सिअस वाढल्याने संपूर्ण निसर्गचक्र बदलले आहे.

**नेमेची येतो पावसाळा**

असं आपण म्हणतो पण यंदा त्याचा नेम चुकलाय आणि तो कधी आणि किती येईल हे सांगणे अवघड झालय. आलाच पाऊस तर नेमकेपणाने तो कुठे, कधी आणि किती पडेल हा देखील सवाल आहे. अशा पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाला सातत्याने हवामान खात्याचा इशारा बघा, माहिती घ्या आणि पेरणी करण्याबाबत घाई करू नका असा झाला आहे.

अल निनोची स्थिती निसर्गतः दर काही काळाने येते मात्र त्याचं गांभीर्य वाढत आहे याचं एकमेव कारण म्हणजे आपण चालवलेला नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होय.

मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड ही जगासमोरील एक मोठी समस्या आहे. सोबतच जंगलांना लागणारी आग अर्थात वन-वणव्यात नष्ट होणारी जंगले यामुळे पृथ्वीवरील वृक्षाच्छादन झपाट्याने घटताना दिसत आहे.

२०१५ च्या फ्रान्स करारानुसार कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्णय झाला परंतु यातून अमेरिकेने माघार घेतली. त्यासोबतच जगभरात जिवाश्म इंधन अपरिमितरित्या वापरले जात आहे. यातून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचा परिणाम वैश्विक पातळीवर होत आहे.

मोठमोठ्या हिमनद्या तसेच अर्क्टीक व अंटार्टिका मधील बर्फ वेगाने वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. याचा धोका थेट पूर्ण पर्यावरणास आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा आणि पैशाच्या बळावर नैसर्गिक संसाधनं ओरबाडत आहोत, असेच म्हणावे लागेल.

पाऊस कमी, दुष्काळ, पाऊस जास्त, अतिवृष्टी, आणिबाणीची स्थिती हे एक चक्र आहे. शासन यात दिलासा नक्की देत आहे पण निसर्ग हा निसर्ग आहे.

Nature is biggest leveler अशी उक्ती आहे. निसर्ग कोपला तर काय यावर डिस्कव्हरी वाहिनीने ठरसळपस झश्ररपशीं नावाची मालिका बनवली आहे ती आपण बघितली पाहिजे.

आपण निसर्गाचाच एक घटक आहोत, आधी बुद्धीमत्ता आणि आता आलेली कृत्रिम बुद्धीमत्ता यांच्या बळावर आपण निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. परंतु हे सर्व प्रयत्न एका फटक्यात आपणास काय स्थितीत नेवून पोहोचवतील याचाही अंदाज हवा आणि जाणीव हवी. आपण निसर्गाचं खूप काही देणं लागतो.

पुढच्या पिढीलाही वसुंधरा सुखरूप देणं हे आपलं कर्तव्य आहे. आपण एक सुरेख ब्लु प्लॅनेट इर्श्रीश झश्ररपशीं नव्या पिढीला देणार की एक ठरसळपस (खवळलेला) Planet याचाही निर्णय आपणास घ्यायचा आहे.

अल निनोच्या संकटावर मात करताना आगामी काळात प्रत्येकाने आपली भूमिका समजून आपले कर्तव्य मानून योग्य कृती न केल्यास काळ कठीण आहे. वेळीच सावध व्हा! अद्याप सुरूवातच झालीय पण उशीर झालेला नाही.

**– प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

## राजस्थानी हेल्दी ड्रिंक :

प्रत्येक ठिकाणांचे हवामान, तिथल्या लोकांचे राहणीमान तिथे पिकणारी धान्य वगैरे वरून तिथल्या लोकांचे खानपान ठरत असते. दक्षिण भारतात जसे रसम. भात, इडली,वडे,डोसे हे पदार्थ आवडीने बनवून खाल्ले जातात ,तसे राजस्थान मध्ये खूपच उष्ण हवामान आहे. तिथली राहणी अत्यंत साधी असून जीवन खूपच कष्टाचे आहे. त्यामुळे तिथे पोटभरीचे, जास्त एनर्जी देणारे असे हेल्दी अन्नच बनवून ग्रहण केले जाते.अजिबात तेल,तुपाचा वापर नं करता असाच एक एनर्जी ड्रिंकचा एकदम टेस्टी, हेल्दी पदार्थ बनवला जातो. पहायचा ना मग?

**साहित्य:**

१ वाटी फुटाणे, ३ बेडगी मिरच्या, १ चमचा जिरे, पाव वाटी वाळवलेला पुदिना, १ चमचा सैंधव, १चमचा चाटमसाला, चिमूटभर हिंग, पाव चमचा ओवा, ७..८ मिरे, चिमूटभर हळद पावडर.

**कृती:**

प्रथम फुटाणे स्वच्छ करून घ्यावेत. वरची साले जेवढी सहज निघतील तेवढी काढून टाकावी. थोडी राहिली तर उत्तमच असते तब्येतीसाठी कारण यातील भरपुर फायबरस मुळे बद्धकोष्ठता होत नाही. त्यानंतर ती एका कढईत घालून ती गॅसवर ठेवावी. त्यातच मिरच्यांचे तुकडे करून ते आणि काळे मिरे घालावेत व भाजायला ठेवावे. एकदम बारीक गॅसवर हे सगळे

भाजायला ठेवावे. हे छान गरम झाले की त्यात जिरे व पुदिना घालून १ मिनिट परतावे व गॅस बंद करून हे डिश मध्ये काढून घेऊन थंड करण्यास ठेवावे.

हे थंड झाल्यावर त्यात हिंग,हळद,सैंधव, चाट मसाला मिक्स करावा व हे मिक्सरच्या भांड्यात घालून एकदम बारीक पावडर बनवून घ्यावी.बारीक पावडर पाण्यात लवकर आणि व्यवस्थित मिक्स होते. त्यामुळे जास्तीत जास्त फाईन पावडर बनवून घ्यावी. आणि घट्ट झाकणाच्या बाटलीत भरून ठेवावी. ही प्री मिक्स पावडर भरपूर दिवस छान राहते.

आता एनर्जी ड्रिंक बनवण्यासाठी एका भांड्यात एक ग्लास पाण्यासाठी एक चमचा पावडर घालावी. त्यात चाट मसाला,सैंधव, मिरे,हिंग ,पुदिना सर्वच असल्याने बाकी काहीच वेगळे घालण्याची गरज नसते. ज्यांना हवे असेल त्यांनी थोडासा लिंबाचा ताजा रस घातला तर किंचीत आंबटसर टेस्ट येते,पण एकदम फ्रेश असल्यामुळे उलट ती जास्त चटपटीत मस्तच लागते. कोणाला आवडत असेल ते त्यात दहि किन्वा ताक घालुन सुद्धा पितात. त्याचीही वेगळीच टेस्ट येते. असे वेगवेगळ्या प्रकारांनी बनवून प्यावे म्हणजे टेस्ट वेगवेगळी येते.

हे सर्व मस्त मिक्स करून वरून थोडी पुदिन्याची पाने घालून थोडासा बर्फ घालून तयार झालेले थंडगार एनर्जी ड्रिंक मस्त ग्लासमध्ये भरून लगेंच सर्व्ह करावे.

**वैशिष्ट्य:**

हे नावाप्रमाणे खरोखरच एक उत्तम एनर्जी ड्रिंक आहे. फुटाणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक असतात. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. हे खाल्ल्याने भूक नियंत्रणात राहते आणि वजन कमी होण्यास मदत होते. तसेच, रक्तातील साखर नियंत्रित राहते आणि हाडे बळकट होतात. वजन नियंत्रणात राहते,फुटाण्यामध्ये भरपूर फायबर असते, हे खाल्ल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि वारंवार भूक लागत नाही, ज्यामुळे वजन कमी होण्यासही मदत होते. यातील फायबर पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास आणि बद्धकोष्ठता टाळण्यास उपयुक्त ठरते. फुटाण्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो, त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढत नाही आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे खाणे उत्तम मानले जाते. यात प्रथिने, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे असतात, जे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवून थकवा दूर करतात. फुटाण्यामध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरसचे प्रमाण असते, ज्यामुळे हाडे आणि स्नायू मजबूत होतात. यातील पोटॅशियम आणि मॅग्नेशियम हृदयाचे आरोग्य उत्तम राखते.त्यामुळे यापासून बनवलेले हे एनर्जी ड्रिंकसुद्धा हेल्दीच असते. मुख्य म्हणजे एकदा पावडर बनवून ठेवली की झटपट कधीही बनवून पिता येते. उन्हाळ्यात तर हे थंडगार सरबत थकवा दूर पळवून लावते आणि भरपूर ताकद देते

शिवाय यात चटपटीत ,स्पायसी असे पदार्थ वापरल्यामुळे तेवढेच टेस्टीसुद्धा लागते बरका! नक्की ट्राय कराच..

**– सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे**

# दुर्गम भागातील ७ आरोग्य योद्ध्यांचा राज्यस्तरीय सन्मान

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव या अतिदुर्गम आदिवासी भागांमध्ये प्रतिकूल परिस्थितीत कार्यरत राहून आरोग्य सेवेचा दीप अखंड तेवत ठेवणाऱ्या सात आरोग्य योद्ध्यांचा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजित आढावा बैठकीदरम्यान दुर्गम भागातील आरोग्य सेवेची वस्तुस्थिती समोर आणणाऱ्या आणि आपल्या कार्यातून उल्लेखनीय परिणाम साधणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. बैठकीस आमदार चित्रा वाघ, आरोग्य आयुक्त डॉ. सुनिल भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी, उपसंचालक डॉ.कपिल अहेर, नंदुरबार जिल्ह्यातील वरिष्ठ आरोग्य अधिकारी तसेच अक्कलकुवा व धडगाव येथील आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या सन्मानाचा उद्देश दुर्गम भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे, त्यांच्या कार्याला सार्वजनिक मान्यता मिळवून देणे आणि इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा देणे हा आहे.

**सन्मानित अधिकारी व कर्मचारी :**

१. डॉ. गुणवंत कांबळे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय मोलगी
२. डॉ. कांतीलाल पावरा, तालुका आरोग्य अधिकारी, धडगाव
३. डॉ. संतोष परमार, स्त्रीरोग तज्ज्ञ, ग्रामीण रुग्णालय धडगाव
४. डॉ. राहुल नायका, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा
५. डॉ. हिमांशू चव्हाण, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ खुर्द
६. चमेली भताने, अधिपरिचारिका, प्राथमिक आरोग्य केंद्र डाब
७. अंजना परमार, आरोग्य सेविका, तरंगता दवाखाना (बोट ॲम्ब्युलन्स), धडगाव

**माता व बाल आरोग्यासाठी उल्लेखनीय योगदान**

डॉ. गुणवंत कांबळे यांनी २०१४ पासून दुर्गम व आदिवासी भागात सेवा बजावताना माता व बाल आरोग्य क्षेत्रात विशेष कार्य केले आहे. प्रसूती व स्त्रीरोग विषयातील पदव्युत्तर पदविका प्राप्त केल्यानंतर त्यांनी नंदुरबार जिल्हा महिला व बालरुग्णालयात तसेच ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या गर्भवती मातांना तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या प्रसूतींची संख्या ७४० वरून ९८० पर्यंत वाढली असून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहे. परिणामी घरगुती प्रसूती कमी होऊन माता मृत्यू कमी करण्यास मोठी मदत झाली आहे.

**रस्ते दुर्गम असले तरी सेवेचा मार्ग सुकर**

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल नायका यांनी गेल्या पाच वर्षांत माता मृत्यूदर कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढविण्यात त्यांना यश आले असून मागील दोन वर्षांत त्यांच्या कार्यक्षेत्रात एकही माता मृत्यू होऊ दिलेला नाही. दुर्गम भागातील नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

**कुपोषण, सिकलसेल आणि आपत्कालीन सेवेत विशेष कार्य**

प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ खुर्द येथील डॉ. हिमांशू चव्हाण यांनी कुपोषण कमी करणे, सिकलसेलग्रस्त रुग्णांचे समुपदेशन व उपचार, उच्च जोखमीच्या गर्भवती मातांचे व्यवस्थापन तसेच असंसर्गजन्य आजारांवरील उपचार यामध्ये विशेष कामगिरी केली आहे. मागील दोन वर्षांत ४० हून अधिक सर्पदंश आणि १५ हून अधिक विंचूदंश रुग्णांचे प्राण वाचविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच अतिदुर्गम भागात जाऊन वैद्यकीय व न्यायवैद्यक सेवाही प्रभावीपणे दिल्या आहेत.

**दुर्गम आदिवासी भागातील मातृआरोग्य सेवेसाठी दोन दशकांची समर्पित सेवा**

ग्रामीण रुग्णालय धडगाव येथील स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. संतोष नथमल परमार हे सन २००४ पासून शासकीय आरोग्य सेवेत कार्यरत असून गेल्या दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी दुर्गम आदिवासी भागातील माता व बाल आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालय धडगाव येथे दरमहा सुमारे १५० ते २०० संस्थात्मक प्रसूतींचे यशस्वी व्यवस्थापन केले जाते.

**आदिवासी भागातील आरोग्य सेवेचे प्रभावी नेतृत्व**

धडगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल शिवाजी पावरा हे मागील २३ वर्षांपासून आदिवासी व अतिदुर्गम भागात सेवा बजावत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली धडगाव तालुक्यात संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढले असून माता मृत्यूदरात लक्षणीय घट झाली आहे. मानव विकास अभियान, १०२ रुग्णवाहिका सेवा, आशा स्वयंसेविकांचे सक्षमीकरण आणि उच्च जोखमीच्या गर्भवतींचे प्रभावी व्यवस्थापन यामुळे माता-बाल आरोग्य सेवांना बळकटी मिळाली आहे.

कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत पुरुष नसबंदी मोहिमेत उद्दिष्टाच्या २०० टक्क्यांहून अधिक कामगिरी करून धडगाव तालुक्याने राज्यात अग्रक्रम मिळविला आहे.

**सेवाभावाची प्रेरणादायी कहाणी**

प्राथमिक आरोग्य केंद्र डाब येथील अधिपरिचारिका चमेली भताने या गेल्या नऊ वर्षांपासून मुख्यालयी वास्तव्यास राहून रात्रंदिवस सेवा बजावत आहेत. त्यांनी आतापर्यंत ९८५ संस्थात्मक प्रसूती यशस्वीपणे हाताळल्या असून प्रसूती सेवा, आपत्कालीन सेवा आणि रुग्णसेवेमध्ये त्यांचे योगदान विशेष आहे. दुर्गम भागातील महिलांना सुरक्षित मातृत्वाचा आधार देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

**नर्मदेच्या लाटांवर आरोग्य सेवेची जीवनदायिनी**

धडगाव तालुक्यातील नर्मदा नदीकाठच्या दुर्गम वस्त्यांमध्ये कार्यरत असलेल्या तरंगत्या दवाखान्याच्या आरोग्य सेविका अंजना परमार यांचे कार्य विशेष प्रेरणादायी आहे. रस्ते नसलेल्या आणि अनेकदा केवळ जलमार्गानेच पोहोचता येणाऱ्या गावांमध्ये त्या बोट ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून नियमित आरोग्य सेवा पोहोचवितात.

गर्भवती माता, नवजात बालके, लसीकरणासाठी पात्र बालके, सिकलसेल रुग्ण आणि वृद्ध नागरिक यांच्यापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या करीत आहेत. पावसाळ्यात नदीला पूर आलेला असतानाही जीव धोक्यात घालून दुर्गम वस्त्यांमध्ये आरोग्य तपासणी, औषध वितरण, समुपदेशन आणि रेफरल सेवा देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. अनेक गंभीर रुग्णांना वेळेत उपचारासाठी स्थलांतरित करून जीव वाचविण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

**दुर्गम भागातील कर्मचाऱ्यांना प्रेरणा**

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, दुर्गम भागात सेवा देणारे आरोग्य कर्मचारी हे आरोग्य व्यवस्थेचे खरे आधारस्तंभ आहेत. अनेक अडचणी, प्रतिकूल परिस्थिती आणि मर्यादित साधनसामग्री असूनही ते नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवत आहेत. त्यांचे कार्य केवळ प्रशंसनीय नाही तर संपूर्ण आरोग्य यंत्रणेसाठी प्रेरणादायी आहे. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.

या सन्मानामुळे नंदुरबारसह राज्यातील दुर्गम भागात कार्यरत हजारो आरोग्य अधिकारी, कर्मचारी, परिचारिका, आशा स्वयंसेविका आणि समुदाय आरोग्य कर्मचाऱ्यांना नव्या जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यंदा देशभरात पाऊस कमी होणार आहे याची कल्पना असूनही केंद्र सरकार 'आमची तयारी आहे' एवढेच सांगत आहे. जनतेस दिलासा देण्या ऐवजी विरोधी पक्ष फोडणे व नेत्याचा गौरव करणे यात सत्ताधारी मग्न आहेत.

जून महिन्याचा दुसरा पंधरवडा संपला तरी महाराष्ट्र कोरडा आहे. केरळमध्ये पोचलेल्या मान्सूनच्या पावसाची प्रगती न झाल्याने या काळातील सरासरीच्या केवळ २६ टक्के पाऊस राज्यात झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगत आहे. जूनच्या पहिल्या पंधरा दिवसांत राज्यात १०८.८ मिलिमीटर पाऊस होणे अपेक्षित असते. त्या ऐवजी २७.४ मिलिमीटर पाऊस झाला आहे. ही परिस्थिती सरकार व सामान्य जनता यांच्या तोंडचे पाणी पळवणारी आहे. खरीप हंगामातील लागवड त्यामुळे कमालीची घटली आहे ही जास्त चिंतेची बाब आहे. या काळात राज्यात सुमारे १४४.४ लाख हेक्टर जमिनीत पेरणी होत असते. यंदा १.४ लाख हेक्टरमध्ये पेरणी झाली आहे. ती सरासरीच्या केवळ १ टक्का आहे. गेल्या वर्षी सरासरीच्या ३ टक्के जास्त म्हणजे ४.२ लाख जमिनीत पेरणी झाली होती. यंदा पाऊस उशिरा सुरू होणार असल्याने व त्याचे प्रमाणही कमी राहण्याची शक्यता आधीच व्यक्त झाली होती. त्यामुळे सरकारनेच शेतकर्यांना पेरणी सुरू न करण्याचा सल्ला दिला होता. पेरणी कमी होण्यामागे तेही कारण असू शकते. येत्या तीन-चार दिवसांतही पाऊस राज्यात दाखल होण्याची शक्यता नसल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. त्यामुळेही पेरण्या आणखी लांबणार आहेत. त्याही पेक्षा पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष तीव्र होण्याची भीती आहे.

नियोजनाचा दुष्काळ



## सजिवसृष्टीवर आलेले जल संकट

पावसाचे आगमन लांबल्याने धरणांतील पाणीसाठा घटला आहे. राज्यांतील सर्व धरणांमध्ये मिळून क्षमतेच्या जेमतेम २४.५३ टक्के पाणीसाठा आहे. त्यातही पुणे विभागाची स्थिती सर्वांत वाईट आहे. या विभागांतील पाण्याचा साठा क्षमतेच्या १४.४१ टक्के आहे. छत्रपती संभाजीनगर २७.४६, नाशिक २५.०३, अमरावती ३७.९३ व नागपूर ३६.४३ अशी विभागानुसार पाणीसाठ्याची आकडेवारी आहे. गेल्या वर्षी याच सुमारास राज्यात ३० टक्के पाणीसाठा होता. राज्यातील बहुतेक धरणे कोरडी होण्याच्या मार्गावर असल्याने धास्तावलेल्या राज्य सरकारने येत्या दि. ३१ ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी पाणी राखून ठेवण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय जल आयोगाने पाणीसाठ्याबाबत काही निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार मे महिन्यात जर धरणातील पाणीसाठा क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी झाला तर आयोग राज्यास इशारा देते. या वर्षी मार्चमध्येच हवामान खात्याने यंदा पाऊस कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. त्याची दखल घेऊन पाण्याचे नियोजन करण्यासाठी जलसंपदा विभागाने हालचाल करणे अपेक्षित होते. पण तसे झालेले नाही हे आताच्या स्थितीवरून कळत आहे. गेली सलग दोन वर्षे महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला होता. गेल्या वर्षी तो सरासरीच्या सुमारे १०४ टक्के होता. अतिवृष्टीने अनेक ठिकाणी नुकसान झाले तो भाग वेगळा.

पण त्या पावसाने राज्यातील सर्व धरणे तुडुंब भरली होती. त्याची माहिती सरकारने प्रसिद्धही केली होती. ते पाणी पुढच्या सहा महिन्यांत कसे व कुठे गायब झाले? पुरेसा किंवा जास्त पाऊस होतो तेव्हाच जलसंपदा विभागाने त्याचे नियोजन का केले नाही, हाही प्रश्न उरतो. गेल्या वर्षीचा पाऊस बघता राज्यांतील धरणांत क्षमतेच्या किमान ४५ ते ५० टक्के पाणीसाठा राहील याची दक्षता या विभागाने घेणे गरजेचे होते.

मात्र देशभरात नियोजनाचाच दुष्काळ असल्याने महाराष्ट्राने तरी त्यात मागे का राहावे? २० जून नंतर पाऊस आला तरी त्याचा जोर कितपत असेल, त्याचे वितरण समान असेल की नाही याबद्दल आता काही सांगता येत नाही.

३१ ऑगस्ट नंतर पिण्यासाठी तरी पाणी कसे पुरवणार हे स्पष्ट नाही. एके काळी २४ तास पाणीपुरवठा होत असलेल्या पुणे शहरात पाणीकपात झाली आहे. ग्रामीण भागातील अवस्थेची कल्पनाही करता येत नाही. शेती कशी करावी? जनावरे कशी जगवावी? याची चिंता शेतकर्यांना लागली आहे. कारखाने कसे चालणार ही दुसरी चिंता आहे. अन्न धान्याचे उत्पादन घटणार हे निश्चित आहे. शेतकर्यांना पुन्हा मदत देण्यास पैसे कुठून येणार? तो भार कोण सोसणार? महाराष्ट्रात योग्य नियोजना अभावी पाण्याचे संकट गंभीर बनले आहे ही बाब मात्र निश्चित.

# योगा की जिम!

## तुमच्या शरीरासाठी कोणता पर्याय अधिक योग्य?

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकजण निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी प्रयत्न करत असतो. यासाठी योगा आणि जिम हे दोन सर्वात लोकप्रिय पर्याय आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकजण निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी प्रयत्न करत असतो. यासाठी योगा आणि जिम हे दोन सर्वात लोकप्रिय पर्याय आहेत.



पण अनेकदा लोकांच्या मनात गोंधळ असतो की, आपल्या ध्येयांसाठी यापैकी काय निवडावे?

चला तर मग, या दोन्ही पर्यायांचा सविस्तर आढावा घेऊया आणि तुमच्या शारीरिक आरोग्यासाठी कोणता प्रकार अधिक प्रभावी आहे, हे समजून घेऊया.योगा हा केवळ एक व्यायाम प्रकार नाही, तर ती एक जीवनशैली आहे. यामध्ये आसन, प्राणायाम (श्वासोच्छवासाचे व्यायाम) आणि ध्यान यांचा समावेश असतो, ज्यामुळे शरीर आणि मन दोन्ही सुदृढ राहतात. निस्तेज आणि तेलकट त्वचा दिसतेय? तर मग चेहऱ्याला द्या नवी चमक, वापरा हे सोपे घरगुती फेस मास्क योगाचे शारीरिक फायदे: उत्तम लवचिकता योगासनांमुळे स्नायू ताणले जातात, ज्यामुळे शरीराची लवचिकता कमालीची वाढते. यामुळे सांधेदुखी आणि शरीराचा ताठरपणा कमी होतो.संपूर्ण शरीराची ताकद योगामध्ये शरीराच्या वजनाचा वापर करून आसने केली जातात. यामुळे शरीरातील प्रत्येक लहान-मोठ्या स्नायूंना व्यायाम मिळतो आणि संपूर्ण शरीराची ताकद वाढते.

# महिलांचे मानसिक आरोग्य आणि आव्हाने

डॉ. गीताली टिळक

कुलगुरू टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

आधुनिक काळात महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. आज महिला केवळ घराची जबाबदारी सांभाळत नाहीत, तर आर्थिकदृष्ट्याही त्या कुटुंबाचा महत्त्वाचा आधारस्तंभ बनल्या आहेत. तथापि, या यशस्वी वाटचालीसोबत अनेक मानसिक आणि भावनिक आव्हानेही निर्माण झाली आहेत. कामकाजी महिलांना घर आणि करिअर यांचा समतोल साधताना मोठ्या प्रमाणावर ताणतणावाचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न आज अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.

मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नाही, तर भावनिक स्थैर्य, आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि दैनंदिन जीवनातील ताणतणाव प्रभावीपणे हाताळण्याची क्षमता होय. नोकरी करणार्या महिलांच्या बाबतीत ही संकल्पना अधिक व्यापक आहे. त्यांना अनेक भूमिका एकाच वेळी पार पाडाव्या लागतात. त्या कर्मचारी, व्यवस्थापक, उद्योजक, पत्नी, आई, मुलगी किंवा सून अशा विविध जबाबदार्या सांभाळत असतात. या सर्व भूमिकांमध्ये संतुलन राखताना मानसिक थकवा निर्माण होणे स्वाभाविक आहे.

नोकरी करणार्या महिलांसमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे वर्क-लाईफ बॅलन्स. कार्यालयीन जबाबदार्या पूर्ण केल्यानंतर घरातील कामे, मुलांचा सांभाळ, ज्येष्ठांची काळजी आणि सामाजिक बांधिलकी यांची जबाबदारी अनेकदा महिलांवरच येते. त्यामुळे स्वतःसाठी वेळ काढणे कठीण होते. सततच्या धावपळीमुळे शारीरिक थकवा वाढतो आणि त्याचा परिणाम मानसिक आरोग्यावरही होतो. कोविडनंतर 'वर्क फ्रॉम होम' संस्कृती वाढली असली तरी अनेक महिलांसाठी ती सोयीपेक्षा अधिक ताण निर्माण करणारी ठरली. घर आणि कार्यालय यांच्यातील सीमारेषा अस्पष्ट झाल्यामुळे कामाचे तास वाढले आणि वैयक्तिक आयुष्याला पुरेसा



वेळ मिळेनासा झाला. परिणामी ताण, चिंता आणि भावनिक थकवा वाढल्याचे अनेक अभ्यासांतून दिसून आले आहे.

ताणतणावाची प्रमुख कारणे

नोकरी करणार्या महिलांमध्ये ताणतणाव निर्माण होण्यामागे अनेक कारणे आहेत. कामाचा वाढता भार, वेळेची मर्यादा, करिअरमध्ये प्रगतीची अपेक्षा, आर्थिक जबाबदार्या आणि कौटुंबिक अपेक्षा यामुळे मानसिक दबाव निर्माण होतो. अनेक महिलांना कार्यस्थळी लिंगभेद, असमान वेतन, पदोन्नतीतील अडथळे किंवा पूर्वग्रहांचाही सामना करावा लागतो. याशिवाय, सर्व काही परिपूर्ण करण्याची मानसिकता अनेकदा महिलांमध्ये दिसून येते. उत्कृष्ट कर्मचारी, आदर्श आई आणि जबाबदार कुटुंब सदस्य बनण्याचा प्रयत्न करताना त्या स्वतःच्या गरजांकडे दुर्लक्ष करतात. हीच गोष्ट दीर्घकालीन ताण आणि मानसिक थकव्याचे कारण बनते.

मानसिक आरोग्यावरील परिणाम

सततचा ताण आणि दडपण यामुळे चिंता, नैराश्य, निद्रानाश, चिडचिड, भावनिक अस्थिरता आणि आत्मविश्वासात घट यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. काही महिलांमध्ये 'बर्नआउट सिंड्रोम' देखील आढळतो. यामध्ये व्यक्तीला सतत थकवा जाणवतो, कामात रस कमी होतो आणि कार्यक्षमता घटते. मानसिक आरोग्याच्या समस्या दुर्लक्षित राहिल्यास त्याचा परिणाम केवळ व्यक्तीवरच नव्हे, तर कुटुंब, कार्यस्थळ आणि सामाजिक संबंधांवरही होतो. त्यामुळे मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्यासाठी

अलीकडच्या काळात मानसिक आरोग्य जपण्यासाठी आर्ट थेरपी (-र्ीं ढहशीर्रिू) हा प्रभावी उपाय म्हणून पुढे आला आहे. चित्रकला, रंगकाम, हस्तकला, शिल्पकला, मंडला आर्ट, लेखन, संगीत किंवा इतर सर्जनशील कलांच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या भावना व्यक्त करू शकते. अनेक कामकाजी महिलांना ताण, चिंता किंवा भावनिक दडपण शब्दांत व्यक्त करणे कठीण जाते. अशा वेळी कला हा भावनांना वाट मोकळी करून देणारा प्रभावी मार्ग ठरतो. आर्ट थेरपीमुळे मन शांत होते, एकाग्रता वाढते आणि नकारात्मक विचारांपासून काही काळ दूर राहण्याची संधी मिळते. रंगांशी खेळणे, चित्रे काढणे किंवा हस्तकलेच्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे यामुळे मेंदूमध्ये सकारात्मक भावना निर्माण करणार्या रसायनांचे स्रवण वाढते. त्यामुळे तणाव कमी होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. विशेषतः कार्यालयीन ताण, घरातील जबाबदार्या आणि सततच्या धावपळीमुळे थकलेल्या महिलांसाठी आर्ट थेरपी ही स्व-अभिव्यक्ती आणि मानसिक विश्रांतीचे प्रभावी साधन ठरू शकते.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**-एल. ग्रिफिथ अभ्यास काय सांगतो?**

शरीरसंबंधावेळी शरीरातून बाहेर पडणाऱ्या इंड्रोफिन्स हार्मोनमुळे पाळीदरम्यान होणाऱ्या वेदनांपासून सुटका होते. पाळीदरम्यान सहवास अशास्त्रीय नाही(मवय वाढलं तरी महिलांनी सुंदर दिसण्याचा आग्रह का? दादा कोंडकेंचे विनोद निष्पाप होते की अश्लील?एके दिवशी धर्मच नामशेष झाला तर...?रचेल यांच्या मते पाळीदरम्यान सहवास केल्यानं रक्तस्रावाचा धोका कमी होऊ शकतो. ज्या महिला पाळीदरम्यान नियमितपणे सहवास करतात त्यांच्या पाळीचा कालावधीही कमी होतो. प्रतिमा मथळा मासिक पाळीदरम्यान सहवास करण्याचे शारीरिक फायदे आहेत.

## २ Joke विनोद




तुला आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला काय हवं? सिंगापूरची दोन तिकिटं की एक छानसा टेपरेकॉर्डर? अनिलने आपल्या पत्नीला विचारले.
ङ्गसिंगापूरची दोन तिकिटंच आणाफ
ङ्का ग?फ
कारण तिथं गेल्यावर टेपरेकॉर्डर घेता येईल. सिंगापूरला टेपरेकॉर्डर खूप स्वस्त मिळतात.

## ३ Message संदेश



Har subah teri duniya me
roshni kar de
Rab tere gum ko teri khushi
kar de,
Jab bhi tootne lage teri san-
sein….Khuda tujme shamil
meri zindagi kar de.

## ४ Thought सुविचार

उद्योग हेच माणसाचे लक्षण आहे.



**संस्कृत सुभाषित**

**दुर्जन: प्रियवादीच नैतद् विश्वासकारणम् । मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषम् ।।**

**अर्थ :** दुष्ट माणूस गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्याच्यावर जिभेवर मध असला तरी हृदयात मात्र भयंकर विष असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार

### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### आडवे उत्तरे

१.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

### उभे उत्तरे

१.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन



३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### तज्ज्ञ आणि प्रशिक्षकांमध्ये मतभेद; खेळाडूंच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर

लॉस एंजेलिस–फिफा विश्वचषक २०२६ मध्ये खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी फिफाने एक मोठा निर्णय घेत, सामन्यांदरम्यान महायड्रेशन ब्रेकफ (पाणी पिण्यासाठी विश्रांती) अनिवार्य केला आहे. मात्र, हा नियम लागू होताच क्रीडा वर्तुळात दोन भिन्न मतप्रवाह दिसून येत आहेत.उत्तर अमेरिकेतील (अमेरिका, मेक्सिको, कॅनडा) वाढते तापमान पाहता, फिफाने प्रत्येक हाफच्या मध्यभागी तीन मिनिटांची विश्रांती देणे बंधनकारक केले आहे. हे नियम तापमान किंवा स्टेडियमच्या वातावरणाकडे दुर्लक्ष करून सर्व सामन्यांसाठी लागू आहेत.टीका आणि वाद:या नियमावर दोन प्रमुख आघाड्यांवरून टीका होत आहे: १. प्रशिक्षक आणि रणनीतीकार: काही तज्ज्ञांच्या मते, या ब्रेकमुळे खेळाचा नैसर्गिक ओघ खंडित होतो. तसेच, प्रशिक्षकांना या वेळेचा उपयोग करून सामन्याची रणनीती बदलण्याची संधी मिळते, ज्यामुळे खेळाच्या निकालावर अनपेक्षित परिणाम होऊ शकतात.कोलंबिया युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी ऑफ कनेक्टिकट येथील तज्ज्ञांच्या मते, तीन मिनिटांचा ब्रेक अत्यंत कमी आहे.

### टीसीएसने मोहम्मद सिराज,तिलक वर्मा आणि रायडू यांना बजावली कायदेशीर नोटीस

मुंबई–भारतीय संघातील स्टार खेळाडू मोहम्मद सिराज, तिलक वर्मा आणि माजी क्रिकेटपटू अंबाती रायुडू हे तिघेही आता मोठ्या अडचणीत सापडले आहेत.या तिघांना टीसीएसने नोटीस बजावली आहे. टीजी २० लीगच्ची नोंदणी झालेली नसतानाही मोहम्मद सिराज, तिलक वर्मा आणि अंबाती रायडूने त्याची जाहिरात केली.यावरुन नवीन वाद निर्माण झाला आहे. नेमकं प्रकरण काय ?मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा क्रिकेट असोसिएशनकडे टी– २० स्पर्धेची नोंदणी झालेली नाही. तरीही मोहम्मद सिराज, तिलक वर्मा आणि अंबाती रायडू या तीन भारतीय खेळाडूंनी लीगची जाहिरात आणि प्रमोशन केले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) या खेळाडूंना प्रमोशनच्या कामांसाठी परवानगी मिळाली नव्हती. बीसीसीआयच्या नियमांनुसार, त्यांच्या परवानगी शिवाय त्याचे प्रमोशन करणे हा नियमांचा भंग मानला जातो.

### १२६ बॉलमध्ये ३०६ रन ठोकल्या

मुंबई–क्रिकेट विश्वात सध्या फक्त एकाच नावाची चर्चा सुरू आहे. १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी क्रिकेटच्या मैदानात रोज नवे विक्रम बनवत आहे. एकीकडे बिहारच्या वैभवची चर्चा सुरू असतानाच बिहारच्या मुलीनेही क्रिकेटच्या मैदानात नवा इतिहास घडवला आहे. बिहार क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या महिला अंडर–१९ वनडे ट्रॉफीमध्ये पहिल्याच दिवशी अक्षरा गुप्ताने विक्रमी बॅटिंग केली.फोर–सिक्सनेच मारल्या २६८ रन

रक्सोलमध्ये राहणाऱ्या अक्षरा गुप्ताने वादळी बॅटिंग करून १२६ बॉलमध्ये ३०६ रन केले. भागलपूरच्या सॅन्डिस कंपाऊंड मैदानावर झालेल्या सामन्यात अक्षरा गुप्ताने बॉलरवर पहिल्या बॉलपासूनच आक्रमण केलं. २३३ मिनिटांच्या या खेळीमध्ये अक्षराने १२६ बॉलमध्ये २४२.८६ च्या स्ट्राईक रेटने ३०६ रनची नाबाद खेळी केली. अक्षराने तिच्या या ट्रिपल सेंच्युरीमध्ये ५५ फोर आणि ८ सिक्स मारल्या, म्हणजेच ३०६ पैकी २६८ रन तर तिने फोर आणि सिक्स मारूनच केल्या.

३४ बॉलमध्ये शतक पूर्ण अक्षराने फक्त १६ बॉलमध्ये तिचं अर्धशतक पूर्ण केलं.

# परतफेडीसह इंग्लंडची विजयी सलामी

## कर्णधार हॅरी केनच्या २ गोलसह ज्युड बेलिंगहॅम आणि मार्कस रॅशफर्डने नोंदवले प्रत्येकी १ गोल



वृत्तसंस्था, डॅलास : आठ वर्षांपूर्वी ज्या संघामुळे विश्वविजयाचे स्वप्न अधुरे राहिले होते, त्याच क्रोएशियाला पराभूत करत इंग्लंडने यंदाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत विजयी सलामी दिली. कर्णधार हॅरी केनचे दोन गोल, त्याला ज्युड बेलिंगहॅमची मिळालेली मोलाची साथ यामुळे इंग्लंडने यंदाच्या स्पर्धेतील आतापर्यंतच्या सर्वांत चुरशीच्या झालेल्या लढतीत क्रोएशियाला ४–२ अशी मात दिली.

रशिया येथे २०१८ साली झालेल्या विश्वचषकात इंग्लंडला उपांत्य फेरीत क्रोएशियाकडून हार पत्करावी लागली होती. त्यावेळी क्रोएशियाचा संघ २–१ असा विजयी ठरला होता. त्यानंतर विश्वचषक स्पर्धेत पुन्हा क्रोएशियाविरुद्ध खेळण्यासाठी इंग्लंडला आठ वर्षे वाट पाहावी लागली. त्यांना नव्या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात ही संधी मिळाली आणि त्यांनी 'त्या' पराभवाची परतफेड करताना जेतेपदासाठीची दावेदारीच सिद्ध केली.

जर्मन प्रशिक्षक थॉमस टुकेल यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या इंग्लंडने सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेतला. सामन्याच्या १२व्या मिनिटाला नॉनी मादुएके याला लुका मॉड्रिचने पाडल्यामुळे इंग्लंडला पेनल्टी मिळाली. यावर केनचा पहिला प्रयत्न क्रोएशियाचा गोलरक्षक डॉमिनिक लिवाकोव्हिचने रोखला, पण केनने चेंडू मारण्यापूर्वीच लिवाकोव्हिच गोलरेषेवरून पुढे आल्याने इंग्लंडला पुन्हा पेनल्टी घेण्याची संधी मिळाली. दुसऱ्या प्रयत्नात केनने चूक न करता इंग्लंडला आघाडी मिळवून दिली.

क्रोएशियाने हार मानली नाही. ३६व्या मिनिटाला मार्टिन बातुरीना याने जोरदार फटका मारत गोल केला. इंग्लंडचा गोलरक्षक जॉर्डन पिकफर्ड याने चेंडूला स्पर्श केला, पण गोल रोखण्यात तो अपयशी ठरला. त्यामुळे सामना १–१ असा बरोबरीत आला. क्रोएशियाचा आनंद फार काळ टिकला नाही. सामन्याच्या ४२व्या मिनिटाला डेक्लन राइसच्या कॉर्नरवर केनने जोरदार हेडर मारत इंग्लंडला पुन्हा आघाडीवर नेले. मात्र, क्रोएशियाने पुन्हा प्रत्युत्तर दिले. पहिल्या सत्राच्या अखेरच्या क्षणांत इव्हान पेरिसिचच्या पासवर पीटर मुसा याने गोल केला आणि क्रोएशियाने २–२ अशी बरोबरी साधली. उत्तरार्धात मात्र इंग्लंडने आपला दर्जा दाखवून दिला. क्लब फुटबॉलमध्ये बलाढ्य रेयाल माद्रिदचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ज्युड बेलिंगहॅमने ४७व्या मिनिटाला दमदार धाव घेत उत्कृष्ट फटका मारत गोल नोंदवला. त्यामुळे इंग्लंडने ३–२ अशी आघाडी घेतली. बेलिंगहॅमच्या गोलनंतर इंग्लंडने अनेक संधी निर्माण केल्या. क्रोएशियाची बचावफळी सतत दडपणाखाली होती. याचा बदली खेळाडू म्हणून आलेल्या मार्कस रॅशफर्डने फायदा घेतला. त्याने सामन्याच्या ८५व्या मिनिटाला शानदार 'फिनिश' करताना इंग्लंडचा विजय सुनिश्चित केला.

इंग्लंडची क्रोएशियावर मात; केन, बेलिंगहॅमचे निर्णायक योगदान विक्रमाशी बरोबरी:

' क्रोएशियाविरुद्धच्या दोन गोलसह हॅरी केनने विश्वचषक कारकीर्दीतील आपली गोलसंख्या १० वर नेली. यासह त्याने विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडकडून सर्वाधिक गोलच्या माजी दिग्गज आघाडीपटू गॅरी लिनेकर यांच्या विक्रमाशी बरोबरी साधली.' लिनेकर यांनी १९८६ आणि १९९० अशा दोन विश्वचषक स्पर्धांत इंग्लंडचे प्रतिनिधित्व करताना १२ सामन्यांत १० गोल केले होते. केनची ही तिसरी विश्वचषक स्पर्धा असून त्याचेही १२ सामन्यांत १० गोल आहेत.

# आयपीएल २०२७ बाबत मोठी घोषणा! 'या' तारखेपासून सुरु होणार स्पर्धा

मुंबई–इंडियन प्रीमियर लीग ही जगातील सर्वात मोठ्या टी२० लीगपैकी एक स्पर्धा आहे. ३१ मे ला आयपीएल २०२६ चा फायनल सामना पार पडला, ज्यात सलग दुसऱ्यांदा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ही स्पर्धा जिंकण्याचा विक्रम रचला. मात्र आता आयपीएल २०२६ सीजन संपतो ना संपतो तोवर बीसीसीआयकडून आयपीएल २०२७ संदर्भात मोठी घोषणा केली आहे. भारतातील अधिकांश भागात मे महिन्यात खूप कडक उन्हाळा असतो, तेव्हा या उन्हाच्या तडाख्यापासून वाचण्यासाठी बीसीसीआय आयपीएल २०२७ चं आयोजन मार्च महिन्यात करण्याचा विचार करत आहे. बोर्डाचे सचिव देवजीत सैकियाने याबाबत माहिती दिली आहे.



कधी केलं जाणार आयपीएल २०२७ चं आयोजन?

बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी दिलेल्या माहितीनुसार १० मार्च ते १५ मे दरम्यान आयपीएल २०२७ चं आयोजन करण्याचा विचार बीसीसीआयकडून केला जात आहे. त्यांनी स्पष्ट केलं आहे की आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यक्रम पाहता सामन्यांची संख्या ७४ चं असणार असून ती वाढविण्यात येणार नाही. आयपीएलचे आतापर्यंत १८ सीजन झाले असून अधिकतर मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आयपीएलचे आयोजन केले जाते तर मे च्या अखेरीस ही स्पर्धा समाप्त होते. सैकिया यांनी बोलताना म्हटले की, आयपीएल लवकर सुरू केल्यास केवळ खेळाडूंनाच नाही, तर प्रेक्षकांनाही फायदा होईल. या वर्षी आयपीएलची सुरुवात २९ मार्च रोजी झाली आणि ती ३१ मे पर्यंत चालली. आम्ही या गोष्टीवर चर्चा करत आहोत की. १५ मे नंतर पावसाचा किंवा मान्–सूनपूर्व हवामानाचा फटका स्पर्धेच्या अंतिम टप्प्यांना बसण्याची शक्यता असते'.दोन आठवडे आधी सुरु होणार स्पर्धा :

बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया पुढे म्हणाले की, 'मे महिन्यात तापमान खूपच उष्ण होते आणि त्यामुळे खेळाडूंसह प्रेक्षकांना सुद्धा त्रास होतो. त्यामुळे आयपीएल दरवर्षीच्या तुलनेत दोन आठवडे आधी सुरु करण्याचा विचार केला जातोय. बीसीसीआय सोबतच आयपीएलच्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये सुद्धा याबाबत चर्चा सुरु आहे की आयपीएल २०२६ स्पर्धा ही मार्चच्या शेवटाऐवजी काही दिवस आधी सुरु करू शकतो का'.

आयपीएलच्या पुढील सीजनमध्ये सामन्यांची संख्या वाढणार असं बोललं जात होतं, मात्र या चर्चांना बीसीसीआयच्या सचिवांनी पूर्णविराम लावला आहे. देवजीत सैकिया म्हणाले की, 'सध्या हे शक्य नाही कारण यात विविध देशातील खेळाडूंचा सहभाग असतो आणि त्यामुळे सर्व बाजुंनी विचार करावा लागेल. आधीच आंतरराष्ट्रीय शेड्युलमधून त्यांना कसा बसा २ महिन्यांचा कालावधी आयपीएल खेळण्यासाठी मिळतो. आयपीएल दोन महिन्यांपेक्षा जास्त वाढवणं कठीण आहे कारण इतर देशांना सुद्धा द्विपक्षीय सामने खेळावे लागतात.

# ना मेस्सी ना रोनाल्डो... कोण आहे जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलर?

दिल्ली–फिफा वर्ल्ड कप २०२६ हा जगातील सर्वात मोठा फुटबॉल वर्ल्ड कप असून यंदा याचा २३ वा सीजन आहे. यंदाचा वर्ल्ड कप हा अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांमध्ये आयोजित करण्यात आला असून यंदा स्पर्धेत एकूण ४८ संघांनी सहभाग घेतला आहे. ११ जून पासून स्पर्धेला सुरुवात झालीये तर याचा शेवटचा सामना हा १९ जुलै रोजी होणार आहे. फुटबॉलचे सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे लिओनेल मेस्सी आणि क्रिस्तिआनो रोनाल्डो हे दोघे यंदा त्यांचा सहावा वर्ल्ड कप खेळणार आहेत. यंदाचा वर्ल्ड कप हा दोघांसाठी शेवटचा सुद्धा ठरू शकतो आणि त्यानंतर दोघे निवृत्त होऊ शकतात. त्यामुळे यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये सर्वांचं लक्ष या दोन खेळाडूंकडे लागलेलं आहे. मेस्सी आणि रोनाल्डो हे दोघे जगातील श्रीमंत फुटबॉलपटूंपैकी एक आहेत. मात्र मेस्सी आणि रोनाल्डो हे जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलर नाहीत, तेव्हा जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलर कोण आहे याविषयी जाणून घेऊयात.



मेस्सी की रोनाल्डो कोण सर्वात श्रीमंत?

मीडिया रिपोर्ट्सनुसार लिओनल मेस्सीची एकूण संपत्ती ही १.१ बिलियन अमेरिकन डॉलर्स म्हणजेच भारतीय रुपयांमध्ये १०४६० कोटी रुपये इतकी आहे. तर दुसरीकडे क्रिस्टियानो रोनाल्डोची अंदाजे संपत्ती ही जवळपास तब्बल १.४ बिलियन अमेरिकी डॉलर म्हणेजच १३३१७ कोटी रुपये आहे. त्यामुळे एकूण संपत्तीच्या बाबतीत क्रिस्टियानो रोनाल्डो हा बाजी मारतो. लिओनेल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो हे दोघे फुटबॉलच्या मैदानावर जवळपास एक दशकाहून जास्त खेळत असून त्यांनी फुटबॉल क्षेत्रातील योगदानासाठी अनेक पुरस्कार देखील जिंकलेत तसेच बरेच रेकॉर्ड सुद्धा नावे केलेत.

जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलर कोण?

लिओनल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो यांनी संपत्ती ही हजारो कोटींमध्ये असली तरी फॅक बोलकियाह हा जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलर आहे. फॅक बोलकियाह हा ब्रुनेई शाही कुटुंबातील सदस्य असून त्याची एकूण संपत्ती ही मेस्सी आणि रोनाल्डोपेक्षा सुद्धा जास्त आहे. फॅक बोलकियाहकडे प्रचंड संपत्ती असूनही फुटबॉलमधून मिळणारे त्याचे उत्पन्न तुलनेने कमी आहे. फाईक बोल्कियाह यांची अंदाजित एकूण संपत्ती सुमारे २० अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच (अंदाजे १,९०,३४४ कोटी रुपये) इतकी आहे.

रोनाल्डो आणि मेस्सीकडे कोणते ब्रॅण्ड्स?

वर्ल्ड कप विजेत्या संघाचा भाग असलेल्या लिओनेल मेस्सीकडे आदिदास, हार्ड रॉक आणि एप्पल सारखे अनेक मोठ्या ब्रॅण्ड्सचे कॉन्टॅक्ट आहेत. क्रिस्टियानो रोनाल्डो याच्याकडे देखील अनेक ब्रॅण्ड्स असून यात छळज्ञश, उठ७, ढरस हर्शीशी, अीरपळ आणि हशीलरश्रळषश सारख्या लग्झरी ब्रॅण्ड्सचा समावेश आहे. क्रिस्टियानो रोनाल्डोकडे फेरारी, बुगाटी, लॅम्बोर्गिनी, रोल्स रॉयस, बेंटले सारख्या महागड्या गाड्या आहेत. लिओनेल मेस्सीकडे फेरारी, मर्सिडीज, पगानी, रेंज रोवर, मासेराती आणि ऑडी सारख्या आलिशान गाड्या आहेत.

# कोल्हापुरातील प्रॅक्टिस फुटबॉल क्लबची शतक महोत्सवाकडे वाटचाल, राज्यातील पहिलाच क्लब

कोल्हापूर–देशभरात आयपीएलसह विविध क्रिकेट स्पर्धादरम्यान क्रिकेटप्रेमींचा नेहमीच उत्साह दिसून येतो. क्वचितच इतर क्रीडा स्पर्धाबाबत क्रीडाप्रेमींची उत्सुकता आणि उत्साह दिसून येतो. मात्र, कोल्हापूर शहर त्याला अपवाद आहे. कारण, चार वर्षांनी येणारा फुटबॉलचा महाकुंभ फिफा विश्वचषक स्पर्धा अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या देशांमध्ये खेळवली जाणार आहे. तब्बल ४८ देश, १०४ सामने या स्पर्धेदरम्यान खेळले जाणार आहेत. यासाठी जगभरातील फुटबॉल शौकिनांमध्ये उत्साहवर्धक वातावरण पाहायला मिळत आहे. यातच कोल्हापुरातील 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब' शतक महोत्सवाकडं वाटचाल करत आहे.

फुटबॉल संघाची वाटचाल शतकाकडं : फुटबॉलचा सामना म्हणजे जीव की प्राण, त्यात सामना जिंकल्यानंतर व्यवस्थापनाकडून मिळणारी लिंबाची फोड म्हणजे जणू विश्वचषक जिंकल्याचा आनंद असतो. सामना खेळण्यासाठी मिळेल त्या वाहनानं तर कधी पायी चालत मैदान गाठणाऱ्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही फुटबॉलप्रेमासाठी सर्वस्व बहाल केलेल्या पिढीनं हा खेळ जिवंत ठेवला. आता याच फुटबॉल संघाची वाटचाल शतकाकडं होत आहे. कोल्हापूरच्या 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब'ची स्थापना १९२७ मध्ये झाली. सध्या फुटबॉल विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर शतक महोत्सवाकडं वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रातील पहिल्या फुटबॉल क्लबची कहाणी चर्चेत आली आहे.

कधी झाली 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब'ची स्थापना? : करवीर संस्थानचे अधिपती छत्रपती शाहू महाराजांनी राजाश्रय दिलेल्या खेळांमध्ये फुटबॉलचाही समावेश होता. संस्थान काळापासूनच कोल्हापुरात फुटबॉलला चालना मिळाली. कोल्हापुरातील मंगळवार पेठेत १९२७ साली त्या काळातील नावाजलेल्या खेळाडूंनी एकत्र येऊन 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब'ची स्थापना केली. या घटनेला आता जवळपास शंभर वर्षे पूर्ण होत आहे. कोणत्याही औपचारिक प्रशिक्षणाशिवाय राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारलेले आणि उत्कृष्ट गोलकीपिंगमुळं 'चायना



वॉल' ही उपाधी मिळवलेले माजी खेळाडू प्रकाश रेडेकर (पिसाळ) यांनी सांगितलं, ''१९६९ ते १९९० या काळात प्रॅक्टिस फुटबॉल क्लबकडून खेळताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला होता. मात्र, उत्कृष्ट खेळ डोळ्यासमोर ठेवत कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय देशातील ग्वाल्हेर, जबलपूर, जोधपूर आणि अहमदाबाद येथे खेळण्याची संधी मिळाली. माझा संघ शंभराव्या वर्षात पदार्पण करत आहे, ही आमच्यासाठी नक्कीच गौरवाची बाब आहे. नव्या पिढीतील खेळाडूंनी समर्पण भावनेतून खेळावे आणि कोल्हापूरचे नाव उंचवावे.'' असं सांगताना रेडेकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

राष्ट्रीय संघात कोल्हापूरचा खेळाडू नक्कीच झळकेल : त्यांनी पुढे सांगितलं, ''आम्हाला ज्या सुविधा मिळाल्या नाहीत, त्या आजच्या खेळाडूंना उपलब्ध आहेत. पूर्वी कॅप्टनवर सर्व टिम अवलंबून होती, आता काळ बदलला आहे. खेळाडूंनी अधिकाधिक सरावावर भर दिल्यास राष्ट्रीय संघात कोल्हापूरचा खेळाडू नक्कीच झळकेल.''असा आशावादही माजी गोलकीपर प्रकाश रेडेकर (पिसाळ) यांनी व्यक्त केला.

६ लिंबू, १२ खेळाडू आणि एसटीचा प्रवास : १९६७ ते १९७१ या काळात या संघाकडून खेळलेले बाळासाहेब पवार यांनी त्या काळातील परिस्थिती सांगितली. ''संघासाठी ऊर्जा म्हणून व्यवस्थापनाकडून फक्त सहा लिंबू मिळायचे. तो अर्धो कापून १२ खेळाडूंमध्ये वाटला जात होता. कोल्हापूरबाहेर सामना असल्यास एसटी चालकाला विनंती करून प्रवासाची व्यवस्था करावी लागायची. मंगळवार पेठेतील शेळके नामक उद्योगपती सामना जिंकल्यानंतर मदत करायचे. मात्र, सुविधांच्या अभावामुळं अनेकदा जीवघेणा प्रवास करावा लागायचा. अंतिम सामना जिंकल्यानंतर फोटो काढायलाही पैसे नसायचे. त्या सर्व संघर्षामुळेच आज 'प्रॅक्टिस फुटबॉल क्लब' राज्यातील पहिला आणि नामांकित फुटबॉल क्लब म्हणून ओळखला जातो. त्या संघाचा आम्ही भाग होतो,'' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

जुन्या खेळाडूंचा सन्मान; वर्षभर विविध उपक्रम : मंगळवार पेठेतील महाराष्ट्रातील पहिला फुटबॉल क्लब असणाऱ्या प्रॅक्टिस फुटबॉल क्लबच्या शताब्दी वर्षानिमित्त फुटबॉल क्षेत्रात योगदान देणाऱ्या जुन्या खेळाडूंचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच नव्या पिढीपर्यंत फुटबॉल खेळ पोहोचावा यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती क्लबचे सेक्रेटरी रमेश मोरे यांनी दिली.

बलाढ्य संघाचं वर्चस्व, या पुढच्या सामन्यात रोमहर्षक लढती : अमेरिका, मेक्सिको कॅनडा देशात खेळवल्या जाणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत सध्या बलाढ्य संघ असलेले पोर्तुगाल, ब्राझील, अर्जेंटिना सारखे संघ चांगला खेळ करत आहेत. तर अमेरिका, इंग्लंड यांच्यासारख्या देशाचे संघ कडवी झुंज देताना सामने पाहायला मिळत आहेत. आता पहिला राऊंड संपलेला आहे. यापुढचे सर्व राऊंड रोमहर्षक लढतीचे असतील आणि फुटबॉलप्रेमी म्हणून या सामन्यांचा निश्चितच आनंद घेणार आहे. फुटबॉल विश्वचषकासाठी कोल्हापूरच्या गल्लीबोळात फुटबॉलमय वातावरण झालं आहे. प्रत्येक जण या सामन्यांसाठी सज्ज असल्याची प्रतिक्रिया प्रॅक्टिस फुटबॉल संघाचा युवा खेळाडू सागर चिले यांनी दिली.

फुटबॉल विश्वचषकाचा उत्साह शिगेला : एकूणच, फुटबॉलची पंढरी म्हणून ओळख असलेल्या कोल्हापुरात फुटबॉल विश्वचषकाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. शहरासह जिल्ह्यातील तालीम संस्था, मंडळांचे कार्यकर्ते आणि खेळाडू सामने पाहण्यासाठी रात्री जागत आहेत. रात्री जागून फुटबॉल सामना पाहायचा आणि सकाळी कामावर निघेपर्यंत याच सामन्यांची चर्चा कोल्हापुरातल्या गल्लीबोळात आणि कट्ट्यांवर रंगल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# ‘नीट’ परीक्षा केंद्रांवरील सुविधांची खातरजमा करा; विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी सूचनांचे काटेकोर पालन करा -जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

**परीक्षेच्या पूर्वतयारी, सज्जतेचा आढावा**

**प्रत्येक परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त; वैद्यकीय पथके तैनात**

**सीसीटीव्ही कार्यान्वित; ड्युटी मॅजिस्ट्रेट व स्टेट ऑब्झर्वर यांची नियुक्ती**

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली परीक्षा केंद्रांची पाहणी

जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीनंतर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी लातूर शहरातील नीट परीक्षा केंद्रांची पाहणी केली. यावेळी त्यांनी दयानंद महाविद्यालय, श्री शाहू महाविद्यालय आणि जयक्रांती महाविद्यालय येथील परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा उपाययोजना, सुविधांचा आढावा घेतला. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यावेळी उपस्थित होते.

**लातूर प्रतिनिधी:** राष्ट्रीय परीक्षा एजेंसीमार्फत (एनटीए) २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली ‘नीट युजी २०२६’ ही परीक्षा पारदर्शकपद्धतीने पार पडावी, यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत ‘एनटीए’ने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांनुसार आवश्यक सुविधा परीक्षा केंद्रांवर उपलब्ध असल्याची खात्री करावी. तसेच विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी काळजीपूर्वक आणि समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या.

‘नीट युजी २०२६’ या परीक्षेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी परीक्षा केंद्रांवरील सुविधा, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य पथकांची नियुक्ती, वाहतूक व्यवस्था आदी बाबींचा आढावा घेतला. उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपविभागीय पोलीस अधिकारी



समीरसिंह साळवे, महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, तहसीलदार राजाभाऊ कदम, आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात एकूण २६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये लातूर येथील १९, अहमदपूर येथील २, उदगीर येथील २, निलंगा येथील २ आणि चाकूर तालुक्यातील चापोली येथील एका परीक्षा केंद्राचा समावेश आहे. या सर्व केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडावी आणि कोणताही गैरप्रकार होऊ नये, यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी ‘ड्युटी मॅजिस्ट्रेट’ आणि ‘स्टेट ऑब्झर्वर’ यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात आले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर आरोग्य पथके तैनात केली जाणार आहेत. या पथकांकडे आवश्यक औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध राहतील, याची खात्री करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले.

परीक्षेदिवशी शहरात विद्यार्थी आणि पालकांची होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवावा. तसेच विद्यार्थी, पालकांनी शक्य तो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. राज्य परिवहन महामंडळाने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यकतेनुसार जादा बसेस सोडण्याचे नियोजन करावे. तसेच बसस्थानक ते शहरातील परीक्षा केंद्रांपर्यंत सिटी बस, विशेष बस सोडाव्यात. लातूर शहराबाहेर असलेल्या परीक्षा केंद्रांवर पोहोचण्यासाठीही विद्यार्थ्यांना बस उपलब्ध होईल, याची खात्री करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले. तसेच परीक्षा केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मोबाईल घेवून जाण्यास परवानगी नाही. त्यामुळे कोणीही मोबाईल घेवून परीक्षा केंद्रांवर येवू नये, असे त्यांनी सांगितले.

उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. साळवे यांनी पोलीस बंदोबस्ताबाबत माहिती दिली. तसेच जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. गायकवाड आणि श्री. सूर्यवंशी यांनी एनटीए कडून प्राप्त सूचनांबाबत माहिती दिली.

## वाढदिवस विशेष लेख

# नेतृत्व, करुणा आणि संस्कारांचा अद्वितीय संगम : डॉ. हनुमंत कराड

शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी, आरोग्य सेवेतील सेवाभाव, सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि भारतीय संस्कृतीशी असलेली नाळ या सर्वांचा सुंदर संगम ज्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो, असे नाव म्हणजे डॉ. हनुमंत कराड. संस्थांची उभारणी करणारे अनेक जन समाजात असतात; परंतु संस्थांबरोबरच माणसे घडविणारे, त्यांना आधार देणारे आणि त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व दुर्मिळ असते. डॉ. कराड हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत.

अनेक जबाबदाऱ्या, विविध पदे आणि व्यापक कार्यक्षेत्र असूनही त्यांच्यातील साधेपणा आणि माणुसकी कायम अबाधित राहिली आहे. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि रुग्ण यांच्यासाठी त्यांचे कार्यालय हे केवळ प्रशासकीय निर्णयांचे केंद्र नसून विश्वास, संवाद आणि मार्गदर्शनाचे खुले व्यासपीठ राहिले आहे. अधिकाराच्या उंच शिखरावर असूनही त्यांनी माणसांशी असलेली जवळीक कधीही गमावली नाही. त्यामुळेच ते केवळ प्रशासक नाहीत, तर अनेकांच्या जीवनातील प्रेरणास्थान बनले आहेत.

**करुणेची स्पर्शून जाणारी कहाणी**

डॉ. कराड यांच्या सेवाभावी वृत्तीची अनेक उदाहरणे आहेत; परंतु एका गरजू महिलेच्या पुनर्वसनाची घटना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील करुणेची खरी उंची दाखवून देते. आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल आणि गंभीर शारीरिक अक्षमतेमुळे हालचाली करण्यास असमर्थ झालेल्या एका महिलेला त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन रुग्णालयात दाखल केले. तिच्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपचार, फिजिओथेरपी, पुनर्वसन, सहाय्यक उपकरणे, पौष्टिक आहार आणि पुढील काळातील आवश्यक सुविधा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून दिल्या.

विशेष म्हणजे, उपचारानंतर तिच्या घराच्या परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. ती आपल्या घरात सुरक्षितपणे फिरू शकेल, दैनंदिन कामे स्वावलंबीपणे करू शकेल आणि तिचा हरवलेला आत्मविश्वास परत मिळवू शकेल, यासाठी घरात आवश्यक बदल सुचविण्यात



आले. त्यांच्या दृष्टीने रुग्ण हा केवळ उपचार घेणारा व्यक्ती नसून सन्मानाने जगण्याचा अधिकार असलेला मानव आहे. आरोग्यसेवा म्हणजे केवळ उपचार नव्हे, तर जीवनाला नवी दिशा देण्याचे माध्यम आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

**शिक्षक नव्हे, तर खरे मार्गदर्शक**

अध्यापनशास्त्र कार्यशाळा असोत किंवा विद्यार्थ्यांशी संवाद, डॉ. कराड यांचे विचार नेहमीच प्रेरणादायी ठरले आहेत. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे माहिती देण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे साधन आहे. ते विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यास प्रोत्साहित करतात, तर शिक्षकांना आपल्या व्यवसायाकडे राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाने पाहण्याचा संदेश देतात. शिक्षण, संस्कार आणि मूल्ये यांचा संगम घडवून आणण्यावर त्यांचा विशेष भर असतो. त्यामुळे त्यांचे प्रत्येक भाषण हे केवळ मार्गदर्शन नसून जीवनाला दिशा देणारा अनुभव ठरतो.

**आधुनिकतेसोबत परंपरेची सांगड**

डॉ. कराड यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक प्रभावी पैलू म्हणजे संस्कृत साहित्यावरील त्यांचे प्रभुत्व आणि अध्यात्माशी असलेले त्यांचे नाते. एका शैक्षणिक कार्यक्रमादरम्यान त्यांनी सहजतेने संस्कृत श्लोक आणि मारुती स्तोत्राचे केलेले पठण उपस्थितांसाठी आश्चर्याचा आणि आनंदाचा विषय ठरले. त्यांच्या मुखोद्गत ज्ञानातून केवळ स्मरणशक्तीच नव्हे, तर भारतीय संस्कृतीबद्दलची निष्ठा आणि आध्यात्मिक साधना प्रकट होत होती.

आजच्या आधुनिक आणि वेगवान युगात परंपरेशी नाते जपत प्रगतिशील विचार मांडणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते विशेष ठरतात. आधुनिक व्यवस्थापन आणि भारतीय संस्कृती यांचा सुंदर समन्वय त्यांच्या जीवनात पाहायला मिळतो.

**विद्यार्थ्यांसोबत चालणारा नेता**

नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर सहप्रवासी होणे, यावर डॉ. कराड यांचा विश्वास आहे. याची प्रचीती आंबाजोगाई येथील ऐतिहासिक मुकुंदराज पर्वतावरील ट्रेकिंग मोहिमेदरम्यान आली.

विद्यार्थी आणि शिक्षकांसोबत त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. वरिष्ठ पदावरील व्यक्ती म्हणून अलिप्त राहण्याऐवजी त्यांनी सर्वांसोबत चालत, संवाद साधत आणि प्रेरणा देत नेतृत्वाचा नवा आदर्श निर्माण केला. या उपक्रमातून त्यांनी संघभावना, जिद्द, सहकार्य आणि सामूहिक यशाचे महत्त्व अधोरेखित केले.

**संस्कारांचा वारसा जपणारे व्यक्तिमत्त्व**

एमआयटी संस्थेच्या परिसरात भगवान गणेश, श्री महालक्ष्मी आणि श्री हनुमान यांच्या मंदिरांची उभारणी करून डॉ. कराड यांनी आपल्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचे जतन केले आहे. विशेष म्हणजे मंदिरांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात त्यांनी आपल्या गुरुजनांना, शिक्षकांना आणि वडिलांना मानाचे स्थान दिले. यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही आपल्या जीवनातील प्रेरणास्थानांना विसरू नये, हा संदेश त्यांच्या या कृतीतून समाजाला मिळतो.

**दिव्यांगांच्या सक्षमीकरणाचे स्वप्न**

समाजातील वंचित आणि दिव्यांग घटकांसाठी काहीतरी भरीव करण्याची त्यांची तळमळ आजही कायम आहे. कृत्रिम अवयव केंद्र, न्यूरो-रिहॅबिलिटेशन सेंटर आणि दिव्यांगांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे त्यांचे स्वप्न हे सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या दृष्टीने अपंगत्व म्हणजे मर्यादा नसून क्षमता विकसित करण्याची संधी आहे. पुनर्वसन, स्वावलंबन आणि सन्मानपूर्ण जीवन हा प्रत्येकाचा अधिकार आहे, अशी त्यांची ठाम भूमिका आहे.

**प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ**

डॉ. हनुमंत कराड यांचे जीवन हे नेतृत्व, सेवा, संस्कार आणि माणुसकी यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी उभारलेल्या संस्था त्यांच्या कार्याचा एक भाग आहेत; परंतु त्यांनी घडविलेली माणसे, दिलेला आत्मविश्वास आणि स्पर्श केलेली आयुष्ये हीच त्यांची खरी ओळख आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी पेटविलेला ज्ञान, करुणा आणि मानवतेचा दीप पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहो, हीच सर्वांची सदिच्छा!

**– डॉ. सुभाष खत्री**
**प्राचार्य**
**महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, लातूर**

# महाराष्ट्र महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सना बी व सी सर्टिफिकेटचे वितरण

**निलंगा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) अंतर्गत घेण्यात आलेल्या बी व सी सर्टिफिकेट परीक्षेत महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील कॅडेट्सनी यश संपादन केले आहे. बी सर्टिफिकेट परीक्षेमध्ये १६ पैकी १५ आणि सी सर्टिफिकेट परीक्षेमध्ये ११ पैकी २ कॅडेट्स यशस्वी झालेले आहेत.

या यशस्वी कॅडेट्सचा गौरव करण्यासाठी महाविद्यालयात प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. ऐन. कदम होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी. एस. चौधरी तसेच एनसीसी अधिकारी डॉ. एस. पी. बसुदे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बसुदे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचा आढावा घेतला. एनसीसीमधील कठोर प्रशिक्षण, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कदम यांनी एनसीसी ही केवळ प्रशिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे नमूद करून एनसीसीमुळे व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण आणि देशसेवेची भावना वृद्धिंगत होत असल्याचे सांगितले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बी व सी सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, सचिव बब्रुवान सरतापे, ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर चे सीओ कर्नल संतोष नवगण, एओ कर्नल वाय. बी. सिंग, सर्व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यशस्वी कॅडेट्सचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०१

# अवैध जनावरे कत्तलीसाठी बांधुन ठेवणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)–** दि.१७.०६/२०२६ रोजी पोलीस अधिक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक . विनोद इज्जपवार सो यांचे आदेशाने मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणे, पाहिजे फरारी आरोपीची माहिती काढुन कारवाई करिता स्थागुशाचे पथक रवाना होवुन पेट्रोलिंग करीत असतांना पथकास माहिती मिळाली की, भुम येथे हाडळ परिसरात प्रकाश यांचे शेतात मोकळ्या जागेत कत्तल करण्यासाठी गोवंशीय जातीचे मोठे जनावरे/ वासरे बांधलेली आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने बातमीच्या ठिकाणी जावून १७.०० वा. सु. छापा मारला असता नमुद ठिकाणी मोकळ्या जागेत चारा पाण्याची कसलीही सोय न करता आखुड दोरीने निर्दयपणे वेगवेगळ्या झाडांना, लाकडांना बांधलेली एकुण ९ गोवंशीय जातीचे लहान मोठे जनावरे/वासरे मिळून आली. सदर जनावरांबाबत व त्यांचे मालका बाबत आजुबाजूचे लोंकाकडे विचारपुस केली. त्यावर त्यांनी सांगितले की, मुस्तफा कुरेशी, वय ३८ वर्षे, रा. भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे मालकीचे असुन त्याने जनावरे/ वासरे ही कत्तलीसाठी बांधून ठेवलेली आहेत असे सांगितले. त्यावर पथकाने नमुद गोवंशीय जातीच्या ५ जर्शी गाय, २ कालवड, १ गिरगाय, १ खिल्लार असे एकुण १,२०,००० किंमतीचे जनावरांना पोलीस ठाणे भुम येथे हजर केले. यावरुन नमुद व्यक्ती विरुध्द पोलीस ठाणे भुम येथे गुन्हा नोंदणी क्रमांक ३६७/२०२६ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१) (एफ) ११(१) (एच) अन्वये गुन्हा नोदंवला आहे.

सदरची कामगिरी .पोलीस अधिक्षक श्रीमती. रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक . विनोद इज्जपवार, सपोनि . अमोल मोरे, पोह –समाधान वाघमारे, बळीराम शिंदे, मपोह– शोभा बांगर, पोलीस नाईक– अशोक ढगारे, चापोअं– दहीहांडे, यांचे पथकाने केली आहे.

# ग्राहकांची इच्छा नसतानाही येतो ४८ तासांत स्मार्ट मीटर बसवण्याचा संदेश:उमरगा तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्यावरून ग्राहकांमध्ये संताप

**उमरगा/प्रतिनिधी :** महावितरणने ग्राहकांना भ्रमणध्वनीवर पाठवलेल्या संदेशात ४८ तासांनंतर विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्यात येईल, असे नमूद केले. या संदेशामुळे ग्राहकांची पूर्वसंमती गृहित धरली जात असल्याचा आभास निर्माण झाला. त्यामुळे ग्राहक संघटना, काही राजकीय संघटना आणि वीज कर्मचारी संघटनांनी आक्षेप नोंदवला. विशेष म्हणजे, राज्यात आधीपासूनच स्मार्ट मीटरविरोधी वातावरण असताना या संदेशामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

स्मार्ट मीटर बसवण्याच्या विरोधात नागरिक, ग्राहक, शेतकरी संघटना व विविध ग्रामपंचायत यांच्याकडून मोठा विरोध होत आहे. महावितरण आणि संबंधित ठेकेदार कंपन्यांतर्फे स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम सुरू असताना अनेक ठिकाणी ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता मीटर बदलले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. दोन दिवसापूर्वी अनेक ग्राहकांना

महावितरणच्या नावाने ४८ तासात स्मार्ट मीटर बसवण्याची पूर्वसूचना असणारा मेसेज आला आहे. परंतु तो मेसेज महावितरणने पाठवला नाही असे महावितरणच्या अधिकाऱ्याकडून सांगण्यात येत आहे. अनेक ठिकाणी जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसवले जात असून, याच्या विरोधात नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर

बसवू नयेत तसेच बसवलेले मीटर काढून घ्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध मीटर बसवले जाणार नाहीत, असे सांगण्यात आले होते. मात्र त्यानंतर अनेक भागांत स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येत आहे. सध्या नवीन वीज कनेक्शन घेताना न विचारता डायरेक्ट स्मार्ट मीटर बसवले जातात. स्मार्ट मीटरने वाढणारी बिले, रिचार्ज पद्धतीची भीती आणि तांत्रिक अडचणी याबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संमतीशिवाय मीटर बसवण्यास विरोध सध्या ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे कोणतेही मीटर बदलण्यापूर्वी संपूर्ण माहिती द्यावी आणि ग्राहकांची लेखी संमती घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. स्मार्ट मीटरबाबत संपूर्ण माहिती जाणून घ्यावी आणि लेखी संमतीशिवाय मीटर बसवण्यास विरोध करावा, असे आवाहन नागरिक व संघटनांकडून करण्यात येत आहे.

# RE-NEET (UG) २०२६ परीक्षेसाठी कलम १६३ लागू ; परीक्षा केंद्रांभोवती १०० मीटर परिसरात निर्बंध

**धाराशिव /जिमाका:** RE-NEET (UG) २०२६ ही परीक्षा रविवार,दि.२१ जून २० रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत धाराशिव शहरातील पाच परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे.परीक्षेच्या सुरळीत, शांततापूर्ण आणि गैरप्रकारमुक्त आयोजनासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यातील श्रीपतराव भोसले हायस्कूल, तांबरी विभाग (७२० परीक्षार्थी),रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,बार्शी रोड (४८०), शासकीय तंत्रनिकेतन,तुळजापूर रोड (३६०),छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,तांबरी विभाग (२८८) आणि जिल्हा परिषद कन्या प्रशाला,शहर पोलीस स्टेशनसमोर (२२४) या केंद्रांवर एकूण २०७२ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षार्थींना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये,बाह्य उपद्रव टाळता यावेत तसेच गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी संबंधित परीक्षा केंद्रांच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास मनाई राहील.शांततेस बाधा निर्माण करणारी कोणतीही कृती करता येणार नाही.परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स केंद्रे,पानपट्ट्या, टायपिंग सेंटर्स,एसटीडी बूथ,ध्वनिक्षेपक, कॉम्प्युटर सेंटर्स व इंटरनेट कॅफे बंद ठेवावे लागतील.

तसेच परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन,सेल्युलर फोन,फॅक्स,ई–मेल सुविधा किंवा इतर प्रसारमाध्यमांशी संबंधित उपकरणे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल.परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण करता येणार नाही. परीक्षा केंद्रांमध्ये वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही.परीक्षेशी संबंध नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रात प्रवेश बंद राहील.केवळ केंद्रावर नियुक्त अधिकारी–कर्मचारी,शासकीय कामावरील अधिकारी–कर्मचारी,संबंधित शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक,कर्मचारी व परीक्षार्थी यांनाच प्रवेश असेल परीक्षार्थींच्या नातेवाईकांनाही प्रवेश दिला जाणार नाही.

याशिवाय परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे.परीक्षा केंद्रात परीक्षेशी संबंधित अधिकारी–कर्मचारी आणि परीक्षार्थी यांच्याशिवाय इतर कोणालाही प्रवेश असणार नाही.

हे आदेश परीक्षा केंद्रांवर कार्यरत अधिकारी –कर्मचारी,परीक्षार्थी,निगराणी अधिकारी व पोलीस अधिकारी–कर्मचारी यांच्या अधिकृत कर्तव्यांवर लागू राहणार नाहीत. संबंधित निर्बंध रविवार,२१ जून २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ या कालावधीत लागू राहतील.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २३३ अन्वये गुन्हा नोंदवून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.हा आदेश १६ जून २०२६ रोजी अपर जिल्हादंडाधिकारी,धाराशिव यांनी जारी केला आहे.

# शिराढोण आरोग्य केंद्र जीर्ण इमारतीतच; रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**कळंब/प्रतिनिधी:** तालुक्यातील शिराढोण येथील पशुवैद्यकीय विभागाच्या धोकादायक व जीर्ण इमारतीतच गेल्या अनेक वर्षांपासून प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे. छत गळणारे, भिंतींना तडे गेलेले आणि कोसळण्याच्या धोक्यात असलेल्या या इमारतीत रुग्णांना उपचार घ्यावे लागत आहेत. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, आणखी किती दिवस जीव मुठीत धरून उपचार घ्यायचे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. कळंब तालुक्यातील शिराढोण हे गाव महत्त्वाचे व्यापारी केंद्र असल्याने परिसरातील अनेक गावांतील नागरिक उपचारासाठी येथे येतात. पूर्वी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत होते. दररोज सुमारे ३०० हून अधिक रुग्णांची तपासणी होत असल्याने शासनाने या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयास मंजुरी दिली. ग्रामीण रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे बांधकाम सन २०१९ मध्ये सुरू करण्यात आले. बांधकामादरम्यान पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र तात्पुरत्या स्वरूपात जुन्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीत हलविण्यात आले.

मात्र तब्बल सात वर्षांचा कालावधी उलटूनही ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून इमारत अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. सध्या वापरात असलेल्या इमारतीचे छत पावसाळ्यात गळते, भिंतींना मोठे तडे गेले असून इमारत कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. आणखी किती दिवस जीव मुठीत धरून उपचार घ्यायचे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून पुन्हा उपस्थित केला जात आहे.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनाही दिले निवेदन शिराढोण येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यंत जीर्ण आणि धोकादायक इमारतीत सुरू असल्याने रुग्ण व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. ही इमारत वापरण्यास अयोग्य असल्याने तातडीने सुरक्षित पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे नितीन पाटील यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नव्या ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीतही गळती व तडे दिसून येत असल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# कळंब पोलीसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

**धाराशिव (शहर व क्राईम रिपोर्टर शेख अंजुम)** – दि.१७.०६.२०२६ रोजी पोलीस ठाणे कळंब चे पोलीस निरीक्षक शेख व राज्य उत्पादन शुल्कं विभागाचे पोलीस निरीक्षक हरीभाउ लांडे यांनी सयुक्तं मोहिम राबवुन कार्यवाही करत कळंब शहरामध्ये पाहटेच अवैध रित्या गावठी हातभट्टी तयार करणारे ५ अड्ड्यावर छापा मारला. कार्यवाही दरम्यान एकुण ५ गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीतांकडुन एकुण १२० लिटर गावठी दारु २,६०० लिटर गुळमिश्रीत रसायन तसेच इतर साहित्यं असा एकुण १,०४,७५०–/(एक लाख चार हजार सातशे पन्नास) रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा मुद्देमाल जागीच नाश केला.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिन पांडकर सर व उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शकील शेख, पोलीस नाईक माळवे, पोलीस अंमलदार कदम, भोसले, मोटेगावकर, महीला पोलीस अंमलदार श्रीरसागर तसेच राज्यं उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक हरीभाउ लांडे व त्यांचे स्टाफसह संयुक्त कारवाई करण्यात आली.

# RE-NEET (UG)-२०२६ परीक्षार्थ्यांसाठी जिल्हा प्रशासनाकडून बससेवेची विशेष सुविधा

**धाराशिव /प्रतिनिधी:** राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA),नवी दिल्ली यांच्या वतीने रविवार,दि.२१ जून २०२६ रोजी (RE-NEET (UG)-2026) पुनर्परीक्षा राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (पदवीपूर्व) – २०२६परीक्षा धाराशिव जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे.

ही परीक्षा दुपारी २ते ५.१५ या कालावधीत होणार असून,दिव्यांग परीक्षार्थ्यांसाठी परीक्षा वेळ दुपारी २ ते सायंकाळी ६.२० अशी राहणार आहे.जिल्ह्यातील एकूण पाच उपकेंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार असून,२०७२ परीक्षार्थी या परीक्षेस बसणार आहेत.

ही परीक्षा धाराशिव जिल्हा मुख्यालयी आयोजित करण्यात आल्याने जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी येणार आहेत.या पार्श्वभूमीवर परीक्षार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.

प्रत्येक तालुक्यातील बसस्थानकांवरून सकाळी ७ वाजल्यापासून धाराशिव जिल्हा मुख्यालयाकडे जाण्यासाठी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. परीक्षार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच बससेवेसंदर्भात कोणतीही अडचण किंवा समस्या उद्भवल्यास 'आपली एस.टी.'या मोबाईल पद्धारे अथवा संबंधित परिवहन विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक मदत मिळविता येणार आहे.

RE-NEET (UG)–२०२६ परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवासाची सोय सुरळीत राहावी आणि परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचता यावे, यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी, RE-NEET (UG)–२०२६,धाराशिव श्री. विद्यारण कडवकर यांनी दिली आहे.

परीक्षार्थ्यांनी वेळेचे नियोजन करून उपलब्ध बससेवेचा लाभ घ्यावा आणि परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेपूर्वी उपस्थित राहावे,असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत बिजोत्पादन कार्यक्रमासाठी नोंदणीचे आवाहन

**धाराशिव जिमाका:** कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६–२७ अंतर्गत तुर व उडीद पिकांच्या बिजोत्पादन कार्यक्रमाची अंमलबजावणी महाबीजमार्फत करण्यात येणार असून,या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कडधान्य उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. अभियानांतर्गत तुर व उडीद या प्रमुख कडधान्य पिकांच्या उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये तुर पिकासाठी 'गोदावरी' जातीचे ३० हेक्टर, 'रेणुका' जातीचे ५० हेक्टर,तर उडीद पिकासाठी 'फुले वसु' जातीचे २५ हेक्टर क्षेत्र निर्धारित करण्यात आले आहे.

सदर बिजोत्पादन कार्यक्रमाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर महाबीज, धाराशिव कार्यालयाशी संपर्क साधून आपली नोंदणी पूर्ण करावी,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री. एन.जी.इनामदार यांनी केले आहे.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत P-CBDC कार्यशाळा उत्साहात संपन्न

**धाराशिव /जिमाका:** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा–२ अंतर्गत 'प्रणाली सेंट्रल बँक डिजिटल चलन' (P-CBDC) विषयक वितरक व विक्रेत्यांची कार्यशाळा तथा प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यशाळेच्या प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती देत P-CBDC प्रणालीची आवश्यकता आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. सध्या कृषी विभागामार्फत 'बॅक–एंडेड सबसिडी' पद्धत कार्यान्वित असली तरी P-CBDC माध्यमातून 'फ्रंट–एंडेड सबसिडी' उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना अर्ज करताना या दोन्हीपैकी कोणतीही एक प्रणाली निवडता येणार असून प्रकल्पातील गावांमधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील शेतकरी तसेच सर्व महिला शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकांकरिता P-CBDC प्रणाली लागू करण्यात आली आहे. अर्ज करण्यापूर्वी लाभार्थ्यांनी आपल्या प्रोफाइलमधील मोबाईल क्रमांक स्मार्टफोनवर सक्रिय असल्याची खात्री करावी,अन्यथा तो अद्ययावत करावा,असे आवाहन करण्यात आले.झ–उइऊ पर्याय निवडून अर्ज केल्यानंतर लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'पंजाब नॅशनल बँक (PNB) डिजिटल रुपी' ॲप डाउनलोड करून,प्रोफाइलमध्ये वापरलेल्या मोबाईल क्रमांकाद्वारे पंजाब नॅशनल बँकेच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने ॲपवर नोंदणी करणे आवश्यक राहणार आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**रेल्वे स्थानकांवरील स्टॉल्ससाठी ई-लिलाव**

विभागीय वाणिज्य कार्यालय कॅटरिंग विभाग, मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर www.ireps.gov.in ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा सूचना क्र.** SUR-MPS-2026-8 आणि SUR-C-TG-26-03; लिलाव कॅटलॉग लॉट क्रमांक: (अनुक्रमांक 1) MPS-SUR-W-DI-MPS-5-25-1 आणि (अनुक्रमांक 2) MPS-SUR-BTW-MPS-6-24-1; **लिलाव सुरू होण्याची व बंद होण्याची तारीख आणि वेळ:** सुरुवात – ३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता, समाप्ती – ३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.४० वाजता. **स्थानकांची नावे:** वाडी आणि बार्शी टाउन स्थानकांवरील MPS स्टॉलचा ई-लिलाव. **लिलाव कॅटलॉग लॉट क्रमांक:** (अनुक्रमांक ३) Catg-SUR-KEM-GMU-11-23-1 आणि (अनुक्रमांक ४) Catg-SUR-DLGN-SMU-70-25-1; **लिलाव सुरू होण्याची व बंद होण्याची तारीख आणि वेळ:** सुरुवात – ०३.०७.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता, समाप्ती – ०३.०७.२०२६ रोजी दुपारी १२.४० वाजता. **स्थानकांची नावे:** केम आणि ढालगाव स्थानकांवरील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव. **पद्धत:** ireps-e auction (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव; **निविदेचा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि ५ वर्षांचा कालावधी ज्यामध्ये चौथ्या व पाचव्या वर्षी १०% वाढ लागू असेल. इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.ireps.gov.in

स. वा. व्य./खानपान/सोलापूर

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.



**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SIDDIQUI MD DARIS KALIM TO MOHAMMAD DARIS KALIM SIDDIQUI.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the MOHAMMAD DARIS KALIM SIDDIQUI. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SIDDIQUI MD DARIS KALIM.
NEW NAME:- MOHAMMAD DARIS KALIM SIDDIQUI
Address :- GALLI NO.20, NEAR HOME GUARD OFFICE, KHAJA NAGAR, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 879430465770
Mob. No.-8766640946



**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : HAJARE SONALI SHARVAN TO SONALI SHRAVAN HAJARE.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SONALI SHRAVAN HAJARE will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- HAJARE SONALI SHARVAN.
NEW NAME:- SONALI SHRAVAN HAJARE
Address :- AT GAWALEWADI, POST WADGAON KATI, TA. TULJAPUR, DIST. OSMANABAD -413623
AADHAR NO.- 909081539827
Mob. No.-8605176615



**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : MANIYAR TAHSEENARA A MAJEED TO: NALBAND TAHESEEN SALIM
Hence for this Declaration i will be known by this name and will use NALBAND TAHESEEN SALIM in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- MANIYAR TAHSEENARA A MAJEED
NEW NAME :- NALBAND TAHESEEN SALIM
Address - 3/56 Kala Maruti chouk civil Hospital Road Osmanabad Dist Osmanabad. -413501
Adhar no.589681571126
Mob.9423587312



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649